सत्यमेव जयते

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

" बुलडाणा शहराला सदोष पाणी वितरण व्यवस्थेमुळे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत " या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा

## अहवाल

( दिनांक     नोव्हेंबर, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
नोव्हेंबर,२०१८

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

## २०१७-२०१८

" बुलडाणा शहराला सदोष पाणी वितरण व्यवस्थेमुळे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत " या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा

# अहवाल

एचबी १६२९-१

## विनंती अर्ज समिति

**(२०१७-२०१८)**

***१. श्री. शरद रणपिसे, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख**

२. श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

३. प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

**४. श्री. किरण पावसकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

१ ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

२ ॲड. हुस्नबाानू खलिफे, वि.प.स.

३ प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. यु. के. चव्हाण, सचिव (एम)

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

* श्री. माणिकराव ठाकरे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागी श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांची कार्यकारी समिती प्रमुख म्हणून दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी नामनियुक्ती केली आहे.

** श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागी श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांची दिनांक १९ सप्टेंबर, २०१८ रोजी सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## विनंती-अर्ज समिती

## (२०१६-२०१७)

(१) श्री.माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख
(२)* श्री. गिरीष व्यास, वि.प.स.
(३)* प्रा.डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
(४)* श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स

**विशेष निमंत्रित**

श्री. कपिल पाटील, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

* सर्वश्री पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर, वि.प.स यांची दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**प्रस्तावना**

"बुलडाणा शहराला सदोष पाणी वितरण व्यवस्थेमुळे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड.रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी दिली व दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. **(परिशिष्ट-एक)**

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज नगर विकासविभागाकडे पाठविण्यात आला. या संबंधीची माहिती नगर विकास विभागाकडून दिनांक २९ डिसेंबर, २०१६ व २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणा-या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव व अन्य अधिका-यांची दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी साक्ष नोंदविली.

विनंती-अर्जासबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट-दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई
दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८

**शरद रणपिसे,**
कार्यकारी समिती प्रमुख,
विधानपरिषद विनंती-अर्ज समिती.

## अहवाल

मी विधानपरिषद विनंती-अर्ज समितीचा समितीप्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

"बुलडाणा शहराला सदोष पाणी वितरण व्यवस्थेमुळे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत" या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी दिली व दिनांक ८ डिसेंबर, २०१६ रोजी प्रस्तुतचा विनंती अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती अर्ज त्याच दिवशी विनंती अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. **(परिशिष्ट-एक)**

अर्जदारांनी विनंती अर्जात नमूद केले आहे की,बुलडाणा शहराला सदोष वितरण व्यवस्थेमुळे नियमित पाणीपुरवठा होत नाही. सोबतच मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत आहे. सदर अपव्यय रोखणे अत्यावश्यक आहे तसेच सुरळीत पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने व तांत्रिक कारणास्तव खडकपूर्णा प्रकल्पावरून रखडलेली पाणीपुरवठा योजना त्वरीत सुरू करण्यासाठी व्यापक जनहिताचा मुद्दा म्हणून सदर प्रकरणाबाबत योग्य तो न्याय द्यावा.

समितीस दिनांक २९ डिसेंबर, २०१६ रोजीच्या नगरविकास विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन) मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे:-

(१) बुलडाणा शहरातील सन २०११ मध्ये मंजूर करण्यात आलेली थ्रिझोन (थ्रिव्हाल्व) वितरण व्यवस्था ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बुलडाणा यांनी पुर्ण करून दिनांक २ ते ९ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नगरपरिषदेकडे हस्तांतरीत केली आहे. बुलडाणा शहरातील थ्री झोन व्यवस्थेवर १२८.१४ लक्ष रूपये खर्च करण्यात आले आहेत.

(२) थ्री झोन योजना कालावधीमध्ये वितरण व्यवस्था मधील त्रुटींचे पुर्णपणे निराकारण झालेले नाही. शहरातील काही भागामध्ये टाकलेली वितरण व्यवस्था फार जुनी असल्यामुळे तसेच पाणीपुरवठा वितरण व्यवस्थामधील भाग वाढल्यामुळे झोन क्र. ३ मधील काही भाग वगळता दररोज पाणीपुरवठा करण्यात आला असून झोन क्र. २ मध्ये दररोज पाणीपुरवठा वितरण करणे शक्य झालेले नाही.

(३) यासंदर्भात मा. राज्यमंत्री (नवि) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा. राज्यमंत्री यांनी दिलेल्या निदेशानुसार झोन क्र. १ मध्ये एकदिवसाआड व झोन क्र. २ व ३ मध्ये तीन दिवासाआड पाणी वितरण करण्यात येत आहे. झोन क्र. १ मध्ये पुढील कालावधीत यशस्वीरित्या पाणी वितरण झाल्यानंतर झोन क्र. ३ मध्ये सुद्धा एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे प्रयत्न नगरपरिषदेमार्फत करण्यात येणार आहेत.

तसेच जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी बुलडाणा शहर पाणीपुरवठा योजनेमध्ये चौकशीसाठी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेब्रुवारी, २०१६ मध्ये सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नगरपरिषदेव्दारा अत्यावश्यक सुधारणाकामांतर्गत consumer servy, water audit,

energy audit, hydraulic modeling, GIS mapping, repairs of existing W.T.P. व उपांगाचे सविस्तर परिपुर्ण प्रस्ताव तांत्रिक मंजूरीकरीता कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा. नागरी व ग्रामीण विभाग, बुलडाणा यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहेत व त्यास तांत्रिक मंजूरी प्रलंबित आहे.

(४) झोन क्र. २ मध्ये पाणीपुरवठायंत्रणा क्षमता वाढविणे आवश्यक असून १३ लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी, संरक्षण भिंत व कर्मचारी निवासस्थान तसेच अनुषंगिक वितरण व्यवस्थाकरिता नागरी दलित वस्ती सुधार योजना, अंतर्गत प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे.

(५) खडकपुर्णा प्रकल्पावरून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रूपये ८२.७७ कोटी रूपये किंमतीची योजना मंजूर झाली असून न.न. हिश्श्याचा भरणा न केल्यामुळे सदर योजना प्रलंबित आहे. सदर योजनेच्या एकूण रूपये १२.८१ कोटी न.प.हिश्श्यापैकी नगरपरिषदेने २० लक्ष रूपयाचा भरणा केलेला आहे.

तसेच १४ व्या वित्त आयोगातील सन २०१६-१७ च्या मुलभूत अनुदानाच्या हप्त्यातून या प्रकल्पाच्या न.प.हिश्श्यापोटी रूपये १.३० कोटी इतकी रक्कम वळती करण्यात आली आहे. उर्वरित लोकवर्गणीचा भरणा करण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे.

(६) वितरण व्यवस्थेमधील त्रुटी दूर करण्यासाठीच्या उपाययोजनांचा DPR तयार करून तो तांत्रिक मान्यतेस्तव नगरपरिषदेमार्फत सादर करण्यात आला आहे.

समितीस दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या नगरविकास विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन- अ) मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे:-

| अ.क्र. | मुद्दा | अभिप्राय/सद्यःस्थिती |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | बुलडाणा शहरातील सन २०११ मध्ये मंजूर करण्यात आलेली थ्रिझोन (थ्रिव्हाल्व) वितरण व्यवस्थेबाबत. | • बुलडाणा शहराला पाणी वितरण व्यवस्थेत सुमारे १२५ व्हॉल्व नियंत्रित करून पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>• वितरीत करावयाच्या एकूण क्षेत्राची तीन मुख्य भागामध्ये (झोन) विभागणी करून नियंत्रीत स्वरूपात तीन व्हॉल्वव्दारे या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत थ्री झोन व्यवस्था वितरणासाठी वापरण्यासाठी |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | सुधारित करण्यात आली. याव्दारे एका झोनमध्ये एकाच व्हॉल्वच्या नियंत्रणातुन पाणीपुरवठा करणे अपेक्षित होते.<br>● बुलडाणा शहर वितरण व्यवस्थेबाबत जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे निर्देशानुसार त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती.<br>● महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिनांक २ ते ९ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत याची चाचणी करून नगरपरिषदेकडे ती हस्तांतरीत केल्याचे नमूद केले आहे.<br>● तथापि, सदर थ्री झोन व्यवस्था संपूर्णपणे यशस्वीरित्या कार्यान्वित झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.<br>● याबाबत करण्यात येणा-या सुधारणांची माहिती अनुक्रमांक ५ मध्ये देण्यात आली आहे. |
| २ | बुलडाणा शहरात एकदिवसाआड/ तीन दिवसाआड होणारा पाणीपुरवठा. | ● शहरासाठीच्या जलस्त्रोताच्या उपलब्धतेची स्थिती विचारात घेऊन बुलडाणा नगरपरिषदेन ठराव क्र. ३७, दिनांक १०/०९/२०१५ रोजी शहरामध्ये तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा ठराव केला होता.<br>● सद्यस्थितीत झोन क्र. २ व ३ मध्ये तीन दिवसाआड तर झोन क्र. १ मध्ये एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याचे मुख्याधिकारी यांनी नमूद केले आहे.<br>● झोन क्र. २ मध्ये पाणीपुरवठा यंत्रणा क्षमता वाढविण्यासाठी १३ लक्ष लिटर्स पाणी क्षमतेची टाकी उभारणे यासाठीच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मंजूरी प्राप्त झाली असून जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | मंजूरी प्राप्त करण्यात येत आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा वारंवारतेत सुधारणा अपेक्षित आहे.<br>• झोन क्र. ३ मध्ये वितरण व्यवस्थेतील मुलभूत सुधारणानंतर पाणी पुरवठा वारंवारतेत सुधारणा अपेक्षित आहे. प्रस्तावित सुधारणांची माहिती अ.क्र.५ मध्ये नमूद आहे. |
| ३ | खडकपूर्णा प्रकल्पाबाबत | • खडकपुर्णा प्रकल्पावरून महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रू. ८२.७७ कोटींचा प्रस्ताव मंजूर असून यात शासनाचा हिस्सा वितरीत करण्यात आला असून नगरपरिषदेच्या रू. १२.८१ कोटी हिस्स्यापैकी सद्य:स्थिती रू. ६.९७ कोटीचा भरणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे करण्यात आला आहे. |
| ४ | नगरपरिषदेने पाणी पट्टी करात दुप्पटीने केलेली वाढ | • महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०८ तसेच कलम १३२ अंतर्गत पाणी पट्टी कर आकरण्याचा नगरपरिषेदस अधिकार प्राप्त आहे.<br>• मुख्याधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे स्थायी आदेशानुसार घरगुती १/२ इंच नळ जोडणीसाठी १९९८ पासून दरवर्षी पासून दरवर्षी १० टक्के दरवाढीनुसार सन २०१५ मध्ये रू. ४०७६.९६ एवढ्या शुल्का ऐवजी रू. १७७२ एवढेच शुल्क आकारण्यात येत आहे. |
| ५ | अ) जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी बुलडाणा शहर पाणीपुरवठा योजनेमध्ये चौकशीसाठी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेब्रुवारी, २०१६ मध्ये सादर केलेल्या चौकशी अहवालाबाबत. | • चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नगरपरिषदेद्वारा अत्यावश्यक सुधारणाकामांतर्गत consumer servy, water audit, energy audit, hydraulic modeling, GIS mapping, repairs of existing W.T.P. व उपांगाचे सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव तांत्रिक मंजुरीकरिता |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | ब) वितरण व्यवस्थेमधील त्रुटी दूर करण्यासाठी DPR तयार करणे. | कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा., नागरी व ग्रामीण विभाग, बुलडाणा यांच्याकडे सादर करण्यात आलेले होते.<br>• प्रस्तावातील त्रुटींचे निराकरण करण्यासाठी Repairs of W.T.P. [water treatment plant] व SCADA [supervisory control & data acquisition control ] हे उपांग वगळून सुधारणा कामाचे रूपये ९५,०३,१४५/- किमंतीचे प्रस्ताव तांत्रिक मंजूरीसाठी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे नगरपरिषदेमार्फत दिनांक १८.०२.२०१७ रोजी सादर करण्यात आले आहेत.<br>• वितरण व्यवस्थेमधील त्रुटी दूर करण्यासाठीच्या उपाययोजनांचा DPR तयार करून तो तांत्रिक मान्यतेस्तव नगरपरिषदेमार्फत सादर करण्यात आला आहे.<br>• अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमधील त्रुटींचे निरीक्षणासाठी सुधारणा कामाचे प्रस्ताव तांत्रिक मंजूरीसाठी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे नगरपरिषदेमार्फत दिनांक १८.०२.२०१७ रोजी सादर करण्यात आले आहे.<br>• तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत बुलडाणा व ४ गांवे पाणीपुरवठा योजनेच्या दुस-या टप्प्यातील कामामध्ये वितरण व्यवस्थेचा समावेश असून सदर कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बुलडाणा यांच्याव्दारे राबविण्यात येणार आहे. त्यान्वये अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमधील त्रुटींचे निराकरण होईल. |

समितीने सदर विनंती अर्जाबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी उप सचिव, नगर विकास विभाग यांची साक्ष घेतली. सदर साक्षीच्या वेळी झालेल्या बैठकीत "बुलडाणा शहराला सदोष पाणी वितरण व्यवस्थेमुळे नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत" यासदंर्भात नेमके काय झालेले आहे याबाबत समितीने विचारणा केली असता उप सचिव, नगर विकास विभाग यांनी नमूद केले की, बुलडाणा शहराला १२५ वॉल्व्हच्या सहाय्याने पाणी वितरीत केले जाते. ज्या भागातील वॉल्व्ह सुरू केला की त्या विभागास पाणी उपलब्ध होत होते. अशी अगोदर व्यवस्था होती. आजही काही ठिकाणी ती आहे. बुलडाणा शहराच्या पाणी पुरवठयासाठी तीन झोन करण्यात यावे असा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पर्याय दिला होता व याला थ्री झोन सिस्टीम किंवा थ्री व्हॉल्व सिस्टीम म्हटले जाते. तीन व्हॉल्व पैकी १ व्हॉल्व सुरू केला की, एका भागाला व दुसरा व्हॉल्व सुरू केला की दुस-या भागाला पाणी मिळेल अशी त्यांची संकल्पना होती व हि सिस्टीम काही प्रमाणात राबविण्यात देखील आली आहे. ही सिस्टीम पूर्णपणे यशस्वी झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. बुलडाणा शहराचा पाण्याचा स्त्रोत यळगाव धरण असून याठिकाणी १२ एमएमक्यूब पाणी आहे. याशिवाय शासनाने खडकपूर्णा योजना मंजूर केलेली आहे. याठिकाणावरून आपल्याला अधिकचे १६० एमएमक्यूब पाणी मिळणार असून ते पाणी वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्टपर्यत येणार आहे. या योजनेचे ६५ टक्के काम पूर्ण झाले असून बुलडाणा शहराला साधारणता १२० लक्ष लिटर पाणी स्त्रोत उपलब्ध असताना ८० लक्ष लिटरचा पाणी पुरवठा केला जातो. मा. जिल्हाधिका-यांना यासंदर्भात त्रिसदस्यीय समिती नेमणूक करून पाण्याचे ऑडिट तसेच हायड्रोलिक मॉडेलिंग करणे व त्यासाठी मुलभूत रिफार्म्स करणे आवश्यक आहे. यळगाव धरण या मुळ स्त्रोतापासून पाणी वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्टमध्ये एकूण तीन टाक्यांमध्ये जाते त्याऐवजी अजून दोन टाक्यांची वाढ करणे आवश्यक आहे त्यामुळे शेवटच्या माणसाला मुबलक दाबाने पाणी मिळेल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

बुलडाणा शहरातील पाणीपुरवठा योजनेचे सर्व फिल्टर गेल्या पाच वर्षापासून पूर्णतः बंद आहे. त्यामुळे लोकांना अशुद्ध पाण्याचा पुरवठा होतो. बुलडाणा शहराची पाणीपुरवठा योजना खरोखरच चांगली करावयाची असल्यास इंटरनल वॉटर सप्लायची डिस्ट्रिब्युशन अपडेट केले पाहिजे. बुलडाणा जिल्ह्यातील पाणीपुरवठ्यातील गळतीची आकडेवारी २१ टक्के असल्याने त्याबाबत पाठपुरावा करून नगर परिषदेने महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडे रिफॉर्म्स संबंधी प्रस्ताव सादर केलेला आहे. सुजल निर्मल महाराष्ट्र अभियान अंतर्गत कोणतीही योजना सुरू होत असताना साधारणता एक कोटी रुपयापर्यंतची सुधारात्मक कामे मंजूर केली जात होती आता पाणीपुरवठा विभागाची सदर योजना बंद झाली असून ती नगर विकास विभागाकडे हस्तांतरीत झाली आहे. त्यातुन ९५ लाख रुपयाची तांत्रिक मान्यता मिळाली असून नगर परिषद फंडातून एकाच वेळी ९५ लाख रूपये खर्च शक्य नाही तेव्हा सदरहू रक्कम जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध करून दिल्यास जलद गतीने कामे होवू शकतात. महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाने थ्री

व्हॉल्व सिस्टीम तयार केली नंतर ती नगर पालिकेला लेखी पत्राव्दारे हस्तांतरीत करून त्याचे टेस्टींग करून सुद्धा आजच्या स्थितीला महाराष्ट्र जीवन प्राधिकारणकडून सदर योजनेचे नगर परिषदेकडे हस्तांतरण झाले नाही.

साक्षीच्या वेळी विनंती अर्जदारांनी आपले मत व्यक्त करताना नमूद केले की, गेल्या दोन अडीच वर्षापासून बुलडाणा शहरात पाणी टंचाई आहे. परंतु, जोपर्यंत पूर्ण स्वीकारले जात नाही तोपर्यंत यामध्ये सुधारणा होण्याची शक्यता दिसत नाही. बुलडाणा जिल्हयात पाणी पुरवठयाच्या बाबतीत सर्व अलबेल आहे. असे दर्शवण्यात प्रशासन आणि नगरपरिषदेचा हात असल्यामुळे दुरूस्ती व सोल्युशन मोडवर आपण लाँग टर्म जाऊ शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी अधिका-यानी जी माहिती दिलेली आहे त्याबाबत मी अशंतः समाधान व्यक्त करतो. परंतु आपण सत्य स्वीकारण्यात अजुनही कमी पडलेलो आहे ही वस्तुस्थिती आहे. त्रिसदस्य समिती ही राज्यसरकारने सांगितल्यामुळे गठीत करण्यात आली असे नसून स्थानिक लोकप्रतिनीधींच्या माध्यमातून ती गठीत करण्यात आलेली आहे. त्रिसदस्य समितीचा अहवाल योग्य आहे परंतु या अहवालामध्ये फार सांभाळून शब्द वापरण्यात आले असून त्यामुळे कोणीही अडचणीत येऊ नये तसेच एकमेकांची सोय बघून त्रिसदस्य समितीचा अहवाल लिहिण्यात आलेला आहे. या अहवालाला पुन्हा एकदा स्वयंस्पष्ट स्वरूपात व्हाईट पेपर तयार करण्याची आवश्यकता आहे. त्रिसदस्य समितीच्या अहवालाबाबत मी खोलवर जाणार नाही, कारण आपण सोल्युशन काढण्यासाठी विनंती अर्ज समितीकडे आलेलो आहे. बुलडाणा शहरातील पाणी पुरवठा योजनेचे सर्व वॉटर फिल्टर गेल्या ५ वर्षापासून पूर्णतः बंद आहेत. वॉटर फिल्टर बंद असतानाही आपण बुलडाणा शहरातील जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देत आहोत असा त्यातून अर्थ होतो. या ठिकाणचे सर्व फिल्टर प्लँट बंद आहेत. बुलडाणा शहरातील जनतेसाठी धरणातून पाणी उचलले जाते व ते पाणी डायरेक्ट जनतेला पुरवले जाते. माझ्या घरातील नळाचे पाणी तपासले तेव्हा ते सुद्धा पिण्यासाठी योग्य आढळून आले. याचा अर्थ पिण्याच्या पाण्यामध्ये गरजेपेक्षा जास्त केमिकल वापरण्यात येत आहे. मशिन बंद असतानाही त्यातुन येणारे पाणी शुद्ध येते. याबाबत समितीने योग्य ती दखल घ्यावी.

त्रिसदस्य समितीचा रिपोर्ट हा स्वयंपूर्ण नाही तसेच या ठिकाणचे फिल्टर प्लँट बंद असून त्याचे डिटेल्स दिलेले आहेत, तसेच शहरात किती पाणी पुरवले जाते त्याचीही माहिती अहवालात देण्यात आलेली आहे. परंतु त्यांनी पाण्याचे लॉसेस किती होतात व कोठे होतात याची माहिती दिलेली नाही. तसेच हा अहवाल परिपूर्ण देखील नाही. त्यामुळे या त्रिसदस्य समितीचा अहवाल हा नव्याने व्हाईट पेपरवर पब्लिश करावा अशी माझी विनंती अर्ज समितीपुढे विनंती राहणार आहे.

एमजीपीमध्ये झालेल्या बैठकीत त्यांनी हैड्रोलिक प्रेशर व इतर गोष्टी सुचविलेल्या आहेत. यासंदर्भात मुद्दा असा आहे की, आज रोजी आपण धरणातून किती पाणी उपसतो ? साधारणतः विजेचे जे बील भरले

जाते त्यासंदर्भात आपण १६ तास पंपिंग केले जाते असे धरले तर ३.२० लाख लीटरच्या दोन मशिन्स पाण्याचे पंपिंग करतात म्हणजे तासी ६.४० लाख लीटरचे पंपिंग होते व ते १५ तास चालते. याचा अर्थ आपण १ कोटी लीटर पर्यंत पाणी उपसतो. परंतु बुलडाणा शहरात नळांची संख्या वैध अवैधतेसह पकडली तर ती १५ हजाराच्या आसपास जाईल. यामध्ये तोटयांचा मुद्दा विनाकारण आणून हा विषय क्लिष्ट केलेला आहे. या ठिकाणच्या कोणत्याही नळाला तोटी लागू शकत नाही कारण प्रत्येक नळाला पाण्याची मोटर लावलेली असून मोटर चालू केली की, घरातील टाकीत पाणी जाते. त्यामुळे पाण्याचा अपव्ययाचा मुद्दा ग्राह्य धरला जाऊ शकत नाही. हा मुद्दा ग्राह्य यासाठी धरला जाऊ शकत नाही की, बुलडाणा शहरात चार-चार,पाच-पाच दिवसातून एकदा पाणी येते. जर दररोज किंवा एक दिवस आड पाणी उपलब्ध करून दिले तर पाण्याचा अपव्यव होणार नाही. तोटी लावण्याबाबत माझा विरोध नाही परंतु या ठिकाणी प्रॅक्टीकली तोटी लावणे शक्यच नाही. मोटर चालू केली तरच घरातील पाण्याच्या टाकीत पाणी जाते व ही परिस्थिती शहरातील ९० टक्के घरात आहे. आपण जर दररोज १ कोटी लीटर पाणी देतो असे ग्राह्य धरले तर त्यातून आपण किती टक्के नळांना पाणी देतो ? आपण चार दिवसातून एकदाच पाणी देतो म्हणजे आपण रोज अडीच ते तीन हजार नळांना पाणी देतो. अडीच ते तीन हजार नळांना रोज एक कोटी लीटर पाणी द्यावयाचे झाले तर किती वेळ लागेल ? एका कनेक्शनमधून आपण २ हजार लीटर पाणी दिले जाते असे गृहीत धरले तरी ३ हजार नळांना रोज २ हजार लीटर पाणी दिले तर त्याची बेरीज ६० लाख लीटरपर्यंत येते. त्यामुळे ४०-५० लाख लीटर पाण्याचे काय होते ? या ठिकाणी पाण्याचे लॉसेस मोठया प्रमाणात आहेत. आपण लॉसेस बंद करीत नाही. धरणातून रोज १.६० लाख लीटर पाणी उचलले जाते व त्यातील १.२० कोटी लीटर पाणी घेतले जाते आणि त्यातील ३०-४० लाख लीटर पाणी नळाला देत आहोत तर बाकीचे पाणी जाते कोठे ? फिल्टर प्लँट बंद आहेत. म्हणजे नगरपालिकेने सुसूत्रेचा अभाव नगरपालिकेने ॲक्सेप्ट करण्याची आवश्यकता आहे. बुलडाणा शहराची पाणीपुरवठा योजना खरोखरच चांगली करावयाची असेल तर इंटरनल वॉटर सप्लायचे डिस्ट्रीब्यूशन अपग्रेड केले पाहिजे. अपग्रेड करण्याची अडचण ही राज्यस्तरावरील आहे. आपल्याकडे जवळचा पाण्याचा स्त्रोत सक्षम आहे. तसेच यासोबत टप्पा क्रमांक २ चे काम एकाचवेळी सुरू करण्यात यावे. बुलडाणा नगरपालिकेकडे मुबलक पाणी आहे. ११२ कि.मी. अंतरावरील खडकपूर्णा वरुन बुलडाणा शहरात पाणी आणण्याची खरे म्हणजे काहीही आवश्यकता नाही.

एमजीपीने थ्री व्हॉल्व्ह सिस्टिम तयार केल्यानंतर त्याबाबत सप्टेंबर, २०१५ मध्ये टेस्टींग घेण्यात आले. त्यानंतर एमजीपीने नगरपालिकेला लेखी पत्राद्वारे कळविले की, आम्ही अमुक योजना तयार केली असून ती आपल्याला हस्तांतरीत करीत आहे. या संदर्भात तत्कालीन मुख्याधिका-यांनी त्यांना लेखी पत्राद्वारे कळविले होते की, योजनेचे टेस्टींग पूर्णतः यशस्वी न झाल्यामुळे पुन्हा टेस्टींग करून द्यावे. परंतु त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे ऑफिशिएली सांगायचे झाल्यास आजच्या स्थितीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सदर योजनेचे नगरपालिकेकडे हस्तांतर झालेले नाही. तसेच

पाणी पुरवठा होत असला तरी मोठ्या प्रमाणात पाणी गळती असल्यामुळे शेवटच्या टोकापर्यंत पाणीपुरवठा होऊ शकत नाही. अहवालात पाणी पुरवठयातील गळतीची आकडेवारी २१ टक्के असल्याचे नमूद केले आहे. सन्माननीय सदस्यांनी सुद्धा समितीला अशी माहिती दिली आहे की, उपलब्ध पाण्याची क्षमता साधारणतः १२० लक्ष लिटर्स असून प्रत्यक्षात ८० लक्ष लिटर्सचा पुरवठा केला जातो. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी चालू असलेल्या व्यवस्थेसंबंधी रिफॉर्मस केले गेले पाहिजे. त्यासाठी पाठपुरावा केला जात असून फेब्रुवारीमध्ये नगरपरिषदेने एमजीपीकडे रिफॉर्मसंबंधी प्रस्ताव सादर केलेला आहे.

समितीने अशी विचारणा केली की, आपल्या स्तरावर रिफॉर्मसंबंधी कार्यवाही पूर्ण होईल किंवा कसे ?

त्यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, जिल्हा डीपीडीसीकडून दलित वस्ती निधी अंतर्गत जो निधी मिळतो त्यात २ लक्ष रुपये राखीव ठेवण्यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी माननीय मंत्री महोदयांकडून जिल्हाधिका-यांना निदेश देण्यासाठी सांगितले होते. आम्ही सुधारित कामांसाठी ९५ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर केलेला आहे. या संदर्भात पार्श्वभूमी अशी आहे की, पाणी पुरवठा विभागात पूर्वी सुजल निर्मल महाराष्ट्र अभियान अंतर्गत कोणतीही योजना मंजूर होताना साधारणतः एक कोटी रुपयांपर्यंतची सुधारात्मक कामे मंजूर केली जात होती. आता पाणी पुरवठा विभागाची सदर योजना बंद झाली असून आता ती नगरविकास विभागाकडे हस्तांतर झाली आहे. आता आम्हाला ९५ लाख रुपयांची तांत्रिक मान्यता मिळाली आहे. परंतु नगरपरिषद फंडातून एकाच वेळी ९५ लाख रुपये खर्च करणे शक्य नाही. माझी समितीला विनंती आहे की, आम्हाला डीपीडीसीकडून ९५ लाख रुपये उपलब्ध करून दिल्यास जलद गतीने कामे करता येऊ शकतील. अन्यथा सुधारात्मक कामांचा ९५ लाख रुपयांचा प्रस्ताव करून नगरविकास विभागाकडे पाठविल्यानंतर तो कधी मंजूर होईल हे सांगता येणार नाही.

समितीने अशी विचारणा केली की, टप्पा क्रमांक २ सुरू करण्यास काही अडचण आहे का ?

यावर विभागाने असे सांगितले की, टप्पा क्रमांक २ सुरू करण्यास काही अडचण नाही. डीएमए कार्यालयाकडे आपली मागणी पाठविली असून आपला हिस्सा सुद्धा भरला आहे. त्यांच्याकडून निधी आल्यानंतर तो एमजीपीकडे वर्ग करीत असतो. यामुळे पुढील कार्यवाही त्यांनी करायची आहे.

समितीने याबाबत अशी विचारणा केली आहे की, नगरविकास विभागाने एमजीपीला अशी सूचना केली टप्पा क्रमांक १ ची कामे झाल्याशिवाय टप्पा क्रमांक २ ची कामे करू नयेत. त्या सूचनेमध्ये दुरुस्ती करीत असताना बुलडाणा शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी टप्पा क्रमांक २ ची कामे प्राधान्याने हाती घेण्याची सूचना एमजीपीला देण्याची गरज आहे. अशा प्रकारे एमजीपीला सूचना दिली जाणार आहे का ?

यावर विभागाने समितीस असे सांगितले की, या संदर्भात प्रस्ताव सादर केलेला आहे. टप्पा क्रमांक १ पूर्ण झाल्यानंतर टप्पा क्रमांक २ सुरू करणे योग्य होईल. त्यापूर्वी टप्पा क्रमांक २ सुरू करू शकत नाही. नगरपरिषदेचा हिस्सा आतापर्यंत भरण्यात आला नव्हता. परंतु आता तो भरण्यात आला आहे. नगरपरिषदेला हिस्सा भरण्यासाठी टप्पा क्रमांक १ आणि टप्पा क्रमांक २ असा विषय नव्हता. एकूण ८२ कोटी रुपयांची योजना असून त्यापैकी नगरपरिषदेने १२ कोटी रुपयांचा हिस्सा भरणे आवश्यक होते. आतापर्यंत नगरपरिषदेने साधारणतः ७ कोटी रुपये भरलेले आहेत. यामुळे पुढील हफ्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

याबाबत समितीने विचारणा केली असता मूळ समस्या खडकपूर्णाचे पाणी नसून इंर्टनल वॉटर सप्लायचा मूळ सोर्स यळगाव आहे. तरी, खडकपूर्णा येथून पाणी आल्यानंतर सुद्धा पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. त्याचप्रमाणे टप्पा क्रमांक १ ची कामे सुरू करण्यात आली आहेत, त्यामध्ये काही त्रुटी आहेत काय ?

यावर विभागाने समितीस असे सांगितले की, वितरण व्यवस्थेतील सुधारणा झाल्यानंतर टप्पा क्रमांक २ ची अंमलबाजावणी होऊ शकेल. सध्या ९० किलोमीटरची वॉटर डिस्ट्रीब्युशन सिस्टीम आहे. टप्पा क्रमांक १ ची कामे जवळपास पूर्ण झाली आहेत.

याबाबत समितीने विचारणा केली असता टप्पा क्रमांक २ ची कामे सुरू करण्यासाठी टप्पा क्रमांक १ ची कामे पूर्ण झाली पाहिजेत असे बंधन असता कामा नये, शहरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. टप्पा क्रमांक १ व टप्पा क्रमांक २ ची कामे एकाच वेळी करण्यास काही हरकत आहे काय?

याबाबत विभागाने समितीस असे सांगितले की, ही संपूर्ण योजना मंजूर आहे, या योजनेचे काम निधीमुळे रखडले होते, नगरपरिषदेचा हिस्सा भरण्यात आलेला आहे. टपा क्रमांक १ व टप्पा क्रमांक २ ची कामे एकाच वेळी सुरू करण्यास काही हरकत नाही. टप्पा क्रमांक १ ची पूर्तता झाल्यानंतर कामे करण्यास हरकत नाही.

याबाबत समितीने विचारणा केली असता टप्पा क्रमांक २ ची कामे आपण सुरू करतो त्यासाठी थांबायची आवश्यकता नाही. टप्पा क्र. २ ची कामे सुरू करावी त्यासाठी पाईपांची व्यवस्था, वितरण व्यवस्था त्याचा मॅप व नियुक्त केलेले कंत्राटदार तेच आहे काय? ही कामे थांबली असतील तर टप्पा क्र. २ सुरू करण्याबाबत समितीसमोर स्पष्टपणे सांगावे या ठिकाणचा सर्व्हे चुकीचा झाला आहे. सर्व्हे आधारानुसार झालेला नाही. त्यानंतर विभागाच्या सचिवांना समितीमार्फत सूचना करण्यात येतील व सर्वे कामे झालेली असताना योजना थांबाविण्याचा शासनाचा प्रयत्न दिसून येत आहे असे समितीला वाटते.

याबाबत विभागाने समितीस असे सांगितले की, जीवन प्राधिकरणाकडून नियुक्त करण्यात आलेले कंत्राटदार आहेत. सर्व्हेमध्ये मूलभुत सुधारणा करावयाच्या होत्या त्यामुळे तो सर्व्हे पूर्ण झालेला नाही. नगरपरिषदेमार्फत ही कामे करून घेणे आवश्यक आहे. टप्पा क्रमांक १ पूर्ण झाल्यानंतर टप्पा क्रमांक २ सुरू करण्याचे निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देत आहोत सुधाराणात्मक कामाचे ९५ लाख रुपयाचे

अंदाजपत्रक दिले असून टप्पा क्र. २ चे ९० किमी. वितरण सिस्टीम शहरात टाकावयाचे आहेत. सिस्टीम मधली त्रुटी जोपर्यंत समजत नाही तोपर्यंत ९० किमी. पाईपलाईन टाकून मोठी अडचण होवू शकते.

याबाबत समितीने विचारणा केली की, सध्याची पाणीपुरवठा योजना २० ते २२ वर्षापूर्वी पूर्ण झालेली आहे. त्या योजनेवर थ्रीव्हॉल्व बसविण्यात आला आहे. योजना फेल गेली आहे. नवीन वितरण व्यवस्था करण्यात येणार आहे. घरांना नळ देण्यात आले आहे त्याठिकाणी नवीन पाईपलाईन टाकता येणार नाही. शहराच्या विस्तारीत भागात पाईप लाईन टाकली जाणार आहे. ज्या ठिकाणी थ्रीव्हॉल्व फेल गेले तेथे मोठे झोन जोडणे आवश्यक आहे, दोन स्वतंत्र वेगळे विषय आहे, रिफॉर्म व इलेक्ट्रीक मोटर लावण्याचे बंद करणे या सर्व आमच्या सूचना आहेत. या सूचना एमजेपी किंवा नगर विकास विभागाने दिलेल्या नाहीत. पाणी पुरवठा योजना चांगली करण्यासाठी आम्ही सूचना करतो. ९५ लाख रुपयांची प्रोव्हीजन वेगळ्याने करता येईल काय ते पहावे. ९० किलोमीटरची पाईपलाईन वाढीव बुलडाणा शहरासाठी आवश्यक आहे. पाईपलाईनवर व्हॉल्व संख्या जास्त होती. १७० वरुन ती १५० वर करण्यात आली आहे. आज पाण्याची साठवण क्षमता ४६ लाख लिटर इतकी आहे. आणखी एक पाण्याची टाकी बांधण्यात आली तर जेवढी पाण्याची गरज शहराला आहे तेवढी साठवण क्षमता उपलब्ध होईल. पूर्वीच्या वितरण व्यवस्थेसंदर्भात आपणाला जे निर्णय घ्यावयाचे आहेत ते तातडीने घेतले पाहिजेत व फिल्टर प्लॅन्ट दुरूस्त करण्यात येत नाही त्याची कारणे काही असली तरी फिल्टर प्लॅन्ट तातडीने दुरूस्त करण्यात यावे.

याबाबत विभागाने समितीस असे सांगितले की, फिल्टर प्लॅन्ट तातडीने दूरूस्त करण्यात येतील.

**अभिप्राय व शिफारशी :—**बुलडाणा शहरातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर असून पाण्याच्या स्त्रोतापासुन नळाव्दारे घरात येणा-या पाण्यापर्यंत अनेक समस्या विनती अर्जात नमूद केल्या आहेत. बुलडाणा शहरात सन २०१२ मध्ये मंजूर करण्यात आलेली पाणीपुरवठा योजना सुरू करताना सदोष वितरण व्यवस्था असल्याने शहरातील १२० भागांचे थ्री झोन निर्माण करून हायड्रोलिक बेस मॉडल तयार करण्यासाठी रूपये १२८.१४ लक्ष खर्च करण्यात आले तथापि, सदर योजना पूर्णतः यशस्वी झालेली नाही. नगर परिषदेने तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा ठराव पारीत केला ही बाब जनतेच्या दृष्टीने अन्यायकारक आहे. बुलडाणा शहराच्या परिसरातील खडकपुर्णा धरण महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांनातर्गत ८,२७७ लक्ष रुपये किंमतीच्या खडकपुर्णा पाणीपुरवठा योजनेस मंजुरी प्रदान करण्यात आली. तरीसुद्धा बुलडाणा शहरात आजपावेतो सदोष पाणीपुरवठ्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यासाठी विनंती अर्जदारांनी बुलडाणा शहरातील पाणीपुरवठा नियमीत होणेबाबत विनंती अर्जात विनंती केली आहे.

समितीने उक्त विषयाबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी सदर विनंती अर्जातील विषयाबाबत नमूद केले की, बुलडाणा शहरातील

पाणीपुरवठा योजनेबाबत सप्टेंबर, २०१५ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने थ्री व्हॉल्व सिस्टीम तयार केल्यानंतर नगर पालिकेला लेखी पत्राव्दारे योजना हस्तांतरीत करीत आहे असे कळविले. परंतु या योजनेचे परिक्षण केले असता ते असफल झाले आहे. आजच्या स्थितीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सदर योजनेचे नगर पालिकेकडे हस्तांतर झाले नाही. बुलडाणा जिल्हयातील पाणीपुरवठ्यातील गळतीची आकडेवारी २१% आहे. तसेच गेल्या पाच वर्षापासून फिल्टरयुक्त पाणी शहरास उपलब्ध होत नाही.

सदर तक्रार ही व्यवस्थापनासंबंधी आहे. योग्य प्रकारे पाणी पुरवठा न केल्यामुळे पाणी वाया जात आहे, पाणी फिल्टर केले जात नाही. यासंबंधी नगर पालिकेची जबाबदारी आहे. तसेच दुसरी योजना करून पाणी पुरवठा करणे ही शासनाची जबाबदारी आहे. या संदर्भात दोन टप्पे केल्यास त्यापैकी एक जबाबदारी नगर परिषदेवर टाकली पाहिजे त्यामध्ये पाणी लिकेज होत असल्यामुळे ते बंद करणे, तसेच पाणी फिल्टर केले जात नव्हते ते फिल्टर करून देणे या बाबी नगर परिषदेने मान्य करणे अत्यावश्यक आहे. याबाबत शासनासंबंधी काही तक्रारी असल्यास विशेष बाब म्हणून शासनाने त्या पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु प्रत्येकाने आपापली जबाबदारी टाळल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी पूर्ण केल्यास सर्व त्रुटी दूर होऊ शकतात. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने योजना तयार केल्यानंतर त्यांच्याकडून ती योजना नगर परिषदेकडे हस्तांतरीत केली जाते. यानंतर सदर योजनेसंबंधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कोणतीही जबाबादारी रहात नाही. परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मूळ निकषानुसार शहराला पाणी पुरवठा होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

बुलडाणा शहरातील सन २०११ मध्ये मंजूर करण्यात आलेली त्रिझोन (थ्रिव्हाल्व) वितरण व्यवस्था ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पूर्ण करून आहे. सप्टेंबर, २०१५ मध्ये नगर परिषदेकडे पत्राव्दारे हस्तांतरीत केली. बुलडाणा शहरातील थ्री झोन व्यवस्थेवर १२८.१४ लक्ष रूपये खर्च करण्यात आले आहेत. तथापि, सदर वितरण व्यवस्थेत काही त्रुटी असल्याने ही वितरण व्यवस्था अयशस्वी ठरली आहे. या योजनेची तीन गटात विभागणी करता येते. पाण्याचा मुळ स्त्रोत, मुळ स्त्रोतापासून ज्या ठिकाणी पाण्यावर ट्रिटमेंट केली जाते तेथपर्यंत व पाण्याच्या ट्रिटमेंटपासून पाण्याचा वापर करणा-या शेवटच्या माणसापर्यंत. बुलडाणा शहराचा पाण्याचा स्त्रोत यळगाव धरण असनू या ठिकाणी १२० एमएमक्यूब पाणी आहे. या शिवाय शासनाने खडकपूर्णा योजना मंजूर केलेली आहे. या ठिकाणाहून अधिकचे १६० एमएमक्यूब पाणी मिळणार असून ते पाणी वाटर ट्रिटमेंट प्लँटपर्यत येणार आहे. या योजनेच आज रोजी साधारणः ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे. विनंती अर्जदारांचा मुद्दा असा होता कि, बुलडाणा शहराला आज रोजी साधारणः १२० लक्ष लिटर पाणी स्त्रोत उपलब्ध असताना केवळ ८० लक्ष लिटरचा पुरवठा केला जातो. या विषयाच्या संदर्भात जिल्हाधिकारी बुलडाणा यांना त्रिसदस्यीय समिती नेमण्यास सांगण्यात आले होते. याबाबत जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी बुलडाणा शहर पाणीपुरवठा योजनेमधील चौकशीसाठी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेब्रुवारी, २०१६ मध्ये अहवाल सादर केला आहे. त्यानुसार योजनेमध्ये काही त्रुटी

आढळून आल्या आहेत. पाण्याचा वापर कोठे कोठे होतो आहे आणि या पाण्याचा वापरकोण करीत आहे याचा सर्व्हे आजपर्यंत झाला नव्हता तसेच वॉटर ऑडीटही करण्यात आले नव्हते. त्यामुळे आता वॉटर ऑडिटमुळे सर्व आकडेवारी तयार होणार आहे. तसेच या ठिकाणी हायड्रोलिक मॉडेलिंग तयार करणे आवश्यक होते. परंतु आजपर्यंत ते झाले नव्हते आपल्याकडे पाण्याचा स्त्रोत असल्यामुळे शेवटच्या माणसापर्यंत दाबाने पाणी उपलब्ध करून द्यायचे झाले तर त्यासाठी हायड्रोलिक मॉडेलिंग करणे आवश्यक आहे. **या सर्व बाबींचा विचार करता वॉटर ऑडीट कंन्झुमर सर्वे व हायड्रोलिक मॉडेलिंग लवकरात लवकर पूर्ण करावे व वितरण व्यवस्थेतील सर्व त्रुटी लवकरात लवकर दूर करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिण्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

बुलडाणा शहराला पुरेसा पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने खडकपूर्णा येथे पाण्याचा स्त्रोत तयार केलेला आहे, शिवाय यळगाव धरण या मुळ स्त्रोतापासून जेव्हा पाणी वॉटर ट्रिटमेंट प्लँटमध्ये जाते व तेथून ते पाणी पाण्याच्या टाक्यामध्ये जाते. आज रोजी पाण्याच्या तीन टाक्या उभारण्यात आल्या असून यामध्ये अधिकच्या दोन टाक्यांची वाढ करण्यात येणार आहे. या दोन टाक्यांपैकी एक पाण्याच्या टाकीला तांत्रिक मंजुरी मिळाली आहे. आता पाण्याच्या मुळस्त्रोतामध्ये वाढ करण्यात येत आहे. तसेच पाण्याच्या तीन टाक्यांसोबात अजून दोन टाक्यांची वाढ करण्यात येत आहे. यामुळे शेवटच्या माणसाला मुबलक दबााने पाणी मिळणार आहे **म्हणून याबाबत समिती अशी शिफारस करते की बुलडाणा शहरातील शेवटच्या माणसाला मुबलक दाबाने पाणी मिळण्याच्या दृष्टीने उर्वरित दोन टाक्या लवकरात लवकर बाांधण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी.**

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी वाटर फिल्टर बंद असल्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. बुलडाणा शहरातील पाणी पुरवठा योजनेचे सर्व वॉटर फिल्टर गेल्या पाच वर्षापासून पूर्णतः बंद आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे. वॉटर फिल्टर बंद असतानाही बुलडाणा शहरातील जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी कसे उपलब्ध करून दिले जाते हे कळत नाही. त्या ठिकाणचे सर्व फिल्टर प्लँट बंद आहेत. बुलडाणा शहरातील जनतेसाठी धरणातुन पाणी उचलले जाते व ते पाणी डायरेक्ट जनतेला पुरविले जाते. तरीही पाणी पिण्यासाठी योग्य असल्याचे आढळून आले आहे. याचा अर्थ असा आहे की, पिण्याचे पाण्यामध्ये गरजेपेक्षा जास्त केमिकल वापरण्यात येत आहेत. ही बाब जनतेच्या जिवाशी खेळण्यासारखी आहे व खचितच भूषणावह नाही असे समितीचे मत आहे. त्यामुळे **बुलडाणा शहराला पाणी पुरवठा करण्यात येत असलेल्या योजनेतील सर्व ठिकाणचे पाणी शुद्ध करण्याचे फिल्टर प्लँट त्वरीत दुरूस्त करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सदर योजनेतील पाणी गळतीचाही मुद्दा चर्चेला आला होता. या योजनेतून बुलडाणा शहराला दररोज १ कोटी लिटर पाणी देतो असे ग्राह्य धरले तर त्यातुन किती टक्के नळांना पाणी दिले जाते? येथे चार दिवसातून एकदा पाणी देण्यात येते म्हणजे रोज अडीच ते तीन हजार नळांना पाणी देतो. एका कनेक्शनमधून आपण २ हजार लिटर पाणी दिले जाते असे गृहीत धरले तरी ३ हजार नळांना रोज २ हजार लिटर पाणी दिले तर त्याची बेरीज ६० लाख लिटर येते. त्यामुळे ४० ते ५० लाख लिटर पाण्याचे काय होते? हा प्रश्न आहे हे पाण्याचे लॉसेस आहेत, पाण्याची गळती आहे व या गळती बाबत कोणत्याही प्रकारचे गांर्भीय दिसुन येत नाही. नगर परिषदेने याबाबत सुसूत्रता ठेवण्याची आवश्यकता आहे. तसेच यासंबंधी नगर परिषदेला ठोस कार्यवाही करावी लागेल अनेक ठिकाणी पाणी पुरवठ्याच्या योजना असतात, लोकांना मुबलक पाणी पुरवठा होत असतो. परंतु लोकांवर वचक नसल्यास त्यांच्याकडून मोटर्सच्या मदतीने मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर केला जातो. परिणामी पुढील लोकांना योग्य प्रकारे पाणी पुरवठा होऊ शकत नाही. या संदर्भात नगर परिषदेने पोलिसांची मदत घेवून कार्यवाही करणे गरजेचे आहे. **याबाबत समिती अशी शिफारस करते की, पाण्याची एवढी मोठया प्रमाणावर गळती होणे ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. त्यामुळे सदर होणारी पाण्याची गळती त्वरीत थांबविण्याच्या दृष्टिने उपाय योजना करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिण्यात सादर करावी.**

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीला सांगण्यात आले की, मा. राज्यमंत्री नगर विकास विभाग यांच्या समवेत झालेल्या बैठकीत मा. राज्यमंत्री महोदयांनी निदेश दिल्यावरून झोन-२ मध्ये एक इएसआर स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या संदर्भात तांत्रिक मंजुरी मिळाली असून प्रशासकीय मान्यता प्रलंबीत आहे. त्यात वॉटर ऑडिट, कन्झ्युमर सर्व्हे इत्यादी मुद्दयांचा समावेश आहे. यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मुळ प्रस्तावात सुधारणा करून त्याला तांत्रिक मंजुरी दिली आहे. हाच वितरण व्यवस्थेतील मूलभूत दोष आहे. पाण्याचा सोर्स आहे तथापि, अद्यापही ऑडीट झालेले नाही. ते आता प्रस्तावित केलेले असून ९५ लाख रूपयांच्या सुधारणात्मक कामांचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सादर करण्यात आले आहे.

यावर विनंती अर्जदारांनी आपले मत व्यक्त करताना नमूद केले आहे की, दलित वस्तीमधून नवीन इएसआर बांधण्यात येत आहे. ते योग्य आहे जेणेकरून दोन नंबरचे अपग्रेडेशन होऊ शकेल. परंतु ती फक्त मलमपट्टी आहे. अल्पसंख्याक व दलित वस्तीच्या भागात ८-८ दिवस पाणी येत नाही. त्यांच्या करिता अपग्रेडेशन करण्यासाठी सदर काम आहे. परंतु मूळ योजनेमध्ये शहरातील संपूर्ण वितरण व्यवस्थेचा समावेश आहे. त्या योजनेला समांतर योजना सुरू करण्याकरिता दुर्लक्ष करून चालणार नाही त्यामुळे टप्पा क्र. २ सुरू करण्याच्या सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिका-यांना देवून त्याकरिता आवश्यक ती मंजूरी घेणे आवश्यक आहे.

नगर परिषदेकडून लोकवर्गणी भरली गेली नसल्यामुळे टप्पा दोनचे काम रखडले होते. तथापि, आता नगर परिषदेने ६ कोटी ९० लाख रूपयांच्या लोकवर्गणीचा हिस्सा भरला आहे. त्यामुळे बुलडाणा शहरात पाणी पुरवठा सुरळीत करायचा असल्यास, टप्पा क्र. २ ची कामे सुरू करावी लागतील. यासंबंधी प्रथम ऑडिट करून घेतले पाहिजे. अन्यथा पूर्वीप्रमाणे तोच प्रश्न निर्माण होईल. तेथील क्षमता, पाण्याची आवश्यकता, अशा विविध गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत व या सर्व बाबींवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लक्ष देणे आवश्यक आहे. टप्पा क्र. १ ची कामे झाल्याशिवाय टप्पा क्र. २ ची कामे सुरू करू नयेत अशी सूचना नगर विकास विभागाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिली असल्याचे साक्षीच्या वेळी निदर्शनास आले. तथापि, समितीचे मत असे आहे की, बुलडाणा शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी टप्पा क्र. २ ची कामे प्राधान्याने हाती घेणे गरजेचे आहे. टप्पा क्रमांक २ ची कामे सुरू करण्यात यावीत. टप्पा क्रमांक २ ची कामे सुरू करण्यासाठी टप्पा क्र. १ ची कामे पूर्ण झाली पाहिजे असे बंधन असता कामा नये. **दोन्ही टप्प्यांना मान्यता असेल तर लवकरात लवकर टप्पा क्र. २ ची कामे सुरू करण्यात यावीत तसेच टप्पा क्र. १ चे काम यापूर्वीच सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे दोन्ही टप्प्याची कामे एकाच वेळी सुरू ठेवण्यात यावीत जेणेकरून सदर पाणीपुरवठा योजनेची कामे लवकरात लवकर पूर्ण होऊन तेथील जनतेला वेळेवर व पुरेसा पाणी पुरवठा होऊ शकेल. याबाबत संबंधितांना तसे निदेश देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट एक
# मूळ विनंती अर्ज

महाराष्ट्र विधानपरिषद

महाराष्ट्र

आ. ॲड. रामहरी रुपनवर
सदस्य
विधान परिषद, महाराष्ट्र

९३६
३१।८।१६.

प्रति :

**मा. सभापती,**
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

विषय :- विनंती अर्ज समितीच्या अनुषंगाने बुलडाणा शहराच्या रखडलेल्या व सदोष पाणी वितरण समस्या दुर करणेबाबत.

मा. महोदय,

बुलडाणा शहराला सदोष वितरण व्यवस्थेमुळे नियमित पाणी पुरवठा होत नाहि. सोबतच मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत आहे. सदर अपव्यय रोखण्या करीता व सुरळीत पाणी मिळण्याच्या अनुषंगाने व तांत्रिक कारणास्तव रखडपुर्ण प्रकल्पावरुन रखडलेली पाणी पुरवठा योजना त्वरीत सुरु करण्यासाठी व्यापक जनहिताचा मुद्दा म्हणुन सदर प्रकरण विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशी सह पाठविण्यात यावे हि विनंती.

आपला,

( रामहरी रुपनवर )
वि.प.स.

# विनंती अर्ज

प्रति,
**मा.ना.श्री. रामराजे निबांळकर साहेब,**
सभापती,
विधान परिषद, विधान मंडळ महाराष्ट्र राज्य,
मुंबई.३२.

**विषय:-** विधीमंडळाच्या विनंती अर्ज समितीकडे बुलढाणा शहरासाठी सन २०१२ मध्ये मंजूर असलेली तथापी रखडलेली पाणी पुरवठा योजना व सदोष वितरण व्यवस्था तातडीने दुरुस्त व पूर्ण करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत.

**संदर्भ:-** १) रुपये ४०४.०५ लक्ष रुपये किमतीचा सन २००५-०६ मध्ये मंजूर करण्यात आलेली पेनटाकळी प्रकल्पावरील तातडीची पाणी पुरवठा योजना

२) रुपये ७३६.१३ लक्ष रुपये किमतीची सन २००९-१० मध्ये मंजूर करण्यात आलेली पेनटाकळी प्रकल्पावरील तातडीची पाणी पुरवठा योजना

३) शहरातील पाणी वितरण व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी रुपये १२८.१४ लक्ष रुपये किमतीची सन २०१०-११ मध्ये मंजूर करण्यात थ्री व्हॉल्व सिस्टीम हायड्रोलिक मॉडेल पाणी वितरण व्यवस्था

४) सन २०१२ मध्ये महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्थान महाअभियनांतर्गत मंजूर करण्यात आलेली रुपये ८२७७ लक्ष रुपये किमतीची खडकपूर्णा धरणातून पाणी पुरवठा योजना

५) बुलढाणा शहरातील पाणी पुरवठा योजनेबाबत जिल्हाधिकारी यांनी स्थापीत केलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीचा अहवाल

6) बुलडाणा शहरातील नागरिकांचे निवेदन दिनांक 20 मार्च 2016

**अर्जदार:-** हर्षवर्धन वसंतराव सपकाळ,
सदस्य, महारष्ट्र विधानसभा
बुलडाणा विधानसभा मतदार संघ

**औचित्य:-** बुलडाणा शहर पाणी पुरवठा व वितरणासाठी करण्यात आलेला कोट्यावधीचा खर्च, तरीही सातत्याने शहरात 5 ते 8 दिवसाआड होणारा अनियमित पाणीपुरवठा, निर्माण करण्यात आलेली कृत्रिम पाणी टंचाई व त्यामुळे नागरिकांमध्ये वाढत असलेला असंतोष.

**महोदय,**

अ) बुलडाणा हे जिल्ह्याचे मुख्यालय तथा पूर्वाश्रमीचे भिलठाणा. अजिंठा पर्वत रांगांच्या सपाट भू-प्रदेशावर इंग्रज राजवटीत बुलडाणा दृष्टीपथात आले. 19 व्या शतकाच्या अखेरीस विदर्भातील थंड हवामानाचा भाग म्हणुन इंग्रज राज्यकर्त्यांनी मध्य प्रांत व बेरार प्रदेशाचा प्रशासकीय कारभारासाठी जिल्हा मुख्यालय म्हणुन बुलडाण्याची निवड केली. ओसाड माळरानात शासकीय वसाहत उभारण्यात आली. आकडेवारीनुसार सन 1971 मध्ये बुलडाणा शहराची लोकसंख्या 15000 एवढी होती. सन 2011च्या जनगणनेनुसार बुलडाणा शहराची लोकसंख्या 80000 एवढी आहे.

आ) उपरोक्त "अ" मध्ये नमूद केलेल्या पूर्वस्थितीच्या अनुषंगाने गेल्या 50 ते 65 वर्षात बुलडाणा गांवाचा यथावकाश विस्तार व विकास झाला आहे. बुलडाणा शहरासाठी आजपर्यंत येळगाव धरण या एकमेव उद्भवातून पाणी पुरवठा केला जात आहे. वाढता विस्तार लक्षात घेता शहरातील नागरिकांना दैनंदिन पाणी पुरवठा करण्याच्या

दृष्टीने शासनाने वेळोवेळी विविध पाणी पुरवठा योजना मंजूर केलेल्या आहेत.

इ) "आ" नुसार नमुद केल्याप्रमाणे संदर्भ क्रमांक 1 नूसार बुलडाणा शहरात निर्माण झालेल्या पाणी टंचाई निवारणार्थ सन 2005-2006 मध्ये पेनटाकळी, ता. चिखली येथील प्रकल्पावरून 404.05 लक्ष रूपये किंमतीची तातडीची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती.

ई) तथापि "इ" मध्ये नमूद योजना ही शहरातील नियमित पाणी पुरवठ्यासाठी पर्याप्त ठरत नसल्याने सन 2009-2010 मध्ये पुनःश्च पेनटाकळी, ता. चिखली येथील प्रकल्पावरून 736.13 लक्ष रूपये किंमतीची तातडीची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती.

उ) उपरोक्त "इ" व "ई" मध्ये नमुद केलेल्या वस्तुस्थितीच्या अनुषंगाने बुलडाणा शहरात सातत्याने निर्माण होत असलेल्या पाणी टंचाईसाठी शहरातंर्गत अस्तित्वात असलेली पाणी वितरण व्यवस्था सदोष व अपुरी असल्याचे दर्शविण्यात आले. त्यानुसार शहरातील 120 भागांचे थ्रिझोन निर्माण करून हायड्रोलिक बेस मॉडेल तयार करण्यासाठी सन 2011 मध्ये बुलडाणा शहर पाणी वितरण व्यवस्था सुधारणा योजनेस मंजुरी प्रदान करण्यात आली. सदर योजनेसाठी रूपये 128.14 लक्ष खर्च करण्यात आलेला आहे.

ऊ) "उ" नुसार सन 2011 मध्ये मंजुर करण्यात आलेली थ्रिझोन (थ्रिव्हॉल्व ) वितरण व्यवस्था सुधारणा ही दिनांक 10 सप्टेंबर 2015 रोजी पूर्ण झाल्याचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण बुलडाणा यांनी जाहिर केले. तसेच सदर योजना ही दिनांक 2 ते 9 सप्टेंबर 2015 या कालावधीत दैनंदिन नियमित पाणी पुरवठा चाचणी पुर्ण करून दि. 11 सप्टेंबर 2015 पासुन नगर परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आल्याचा अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

ऋ) दरम्यानच्या काळात बुलडाणा शहराचा भौगोलिक स्थितीचा विचार करता व नियमित होणा-या अल्प पर्जन्यमानामुळे बुलडाणा शहरास पुरवठा होणा-या येळगांव धरणामध्ये पुरेसा पाणी पुरवठा उपलब्ध होत

नसल्याने वेळोवळी बुलडाणा शहरास तीव्र पाणी टंचाईस तोंड द्यावे लागते, असे कारण देत बुलडाणा शहराच्या परिसरास 60 कि.मी. अंतरावरील खडकपूर्णा धरणाचा भूपृष्ठीय शाश्वत स्त्रोत उपलब्ध असुन सदर ठिकाणाहुन बुलडाणा शहरासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांतर्गत 8277 लक्ष रूपये किमंतीच्या खडकपूर्णा पाणी पुरवठा योजनेस मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

ऌ) विधानसभा तारांकीत प्रश्न क्र. 49213 दि. 25 मार्च 2016 रोजी मा. मुख्यमंत्री यांनी उत्तरात दिलेल्या माहितीनुसार बुलडाणा शहरासाठी खडकपुर्णा प्रकल्पावरून सन 2012 मध्ये मंजुर करण्यात आलेल्या 82.77 कोटी किमतीच्या पाणी पुरवठा योजनेसाठी नगर परिषदेने 16.55 कोटी रूपये सहभाग निधी देणे अपेक्षीत असतांना अद्यापपर्यंत प्रथम हप्त्याच्या 8.27 कोटी रूपयांचा भरणा न केल्यामुळे सदर योजना रखडल्याचे नमुद केले आहे.

ऍ) "उ" व "ऊ" च्या पार्श्वभूमीवर दि. 15 मार्च 2016 रोजी तारांकीत प्रश्न क्रमांक 47776 अन्वये मा. मुख्यमंत्री यांनी विधानसभेत दिलेल्या उत्तरात बुलडाणा शहरातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवरील झोनींग च्या कामात तांत्रीक त्रृटी निर्माण झाल्याने नगर परिषदेने दि. 10 सप्टेंबर 2015 रोजी शहरामध्ये तिन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा ठराव पारीत केल्याचे नमुद करण्यात आले आहे.

ऎ) "ऊ" मध्ये नमुद केल्यानुसार बुलडाणा शहरातील थ्रि झोन व्यवस्थेवर रूपये 128 .14 लक्ष तरतूद खर्च करण्यात आल्याचे नमुद केले असुन दैनंदिन यशस्वी पाणी पुरवठा चाचणी नंतर सदर योजना दि. 11 सप्टेंबर 2015 रोजी नगर परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आल्याचे नमुद केलेले आहे.

ए) "ऊ" ते "ऐ" मध्ये नमुद वस्तुस्थितीच्या अनुषंगाने जर सदर योजना यशस्वी चाचणी नंतर दि. 11 सप्टेंबर 2015 रोजी नगर परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आली होती. तर त्यापुर्वीच म्हणजे दि. 10 सप्टेंबर 2015 रोजी तांत्रीक त्रृटी निर्माण झाल्याने शहरामध्ये तिन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा ठराव नगर परिषदेने कसा पारीत केला? हे अनाकलनीय आहे.

ऐ) इतःप्पर संदर्भ क्रमांक 5 अन्वये मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी बुलडाणा शहर पाणी पुरवठा योजनेच्या चौकशीसाठी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेब्रुवारी 2016 मध्ये सादर केलेल्या चौकशी अहवालात शहरातील पाणी पुरवठा समस्येबाबत गंभीर निष्कर्ष नोंदविलेले आहेत. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नगर परिषदेने पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्था या बाबत एप्रिल 2016 पर्यंत कोणत्याही ठोस उपाययोजना केलेल्या नाहीत.

ऑ) बुलडाणा शहरात गत काही वर्षापासुन नागरिकांना सातत्याने अनियमित व अपूरा पाणी पुरवठा होत आहे. असे असतांना कृपया संदर्भ क्रमांक 6 अन्वये सोबत जोडण्यात येत असलेल्या बुलडाणा शहरातील नागरीकांच्या निवेदनाचे अवलोकन व्हावे. बुलडाणा नगर परिषदेने सन 2015-16 या वित्तीय वर्षासाठी पाणी करात दुपटीने वाढ केलेली आहे. सदरचा ठराव दि. 16 फेब्रुवारी 2015 रोजी घेण्यात आला होता. मात्र करवाढ केल्यानंतर नागरिकांकडून आक्षेप, हरकती वा सुचना या बाबतची कोणतीही लोकाभिमुख प्रक्रिया नगर परिषद प्रशासनाकडून पूर्ण करण्यात आलेली नाही. बुलडाणा शहररातील तीन ते पाच दिवसाआड होणारा पाणी पुरवठा व करण्यात आलेली दुप्पटीची करवाढ अन्यायकारक असल्याने नागरीकांच्या वतीने मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्याकडे नगर परिषदेचा ठराव रद्दबातल करण्यासाठी प्रकरण दाखल करण्यात आलेले आहे. तथापी अद्यापही सदर प्रकरण प्रलंबीत असुन नगर परिषद प्रशासनाकडून पाणी पुरवठा बंद करून, धमक्या देऊन व गुंडागर्दीच्या प्रकारांचा अवलंब करीत असल्याचे नागरिकांनी त्यांच्या निवेदनात नमुद केले आहे. लोकशाही प्रक्रियेत ही एक प्रकारे नागरिकांची गळचेपी असुन त्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला आहे.

ऑ) संदर्भ क्र. 6 अन्वये नागरिकांनी समक्ष भेटून नगर परिषद प्रशासनाविरूध्द असंतोष व तक्रारी व्यक्त केल्या आहेत. उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने सत्वर कार्यवाही न झाल्यास बुलडाणा शहरातील कृत्रीम पाणी टंचाईमुळे बिकट परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी आपणास विनंती आहे की, मानव अधिकार व नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने बुलडाणा शहरातील नागरिकांना तोंड द्याव्या लागणा-या कृत्रिम पाणी टंचाईने होत असलेली होरपळ व मुस्कटदाबी लक्षात घेता व्यापक जनहिताचा मुद्दा म्हणुन सदर प्रकरण "विनंती अर्ज समितीकडे" आपल्या शिफारसीसह पाठविण्यात यावे, ही विनंती.

दिनांकः- एप्रिल 2016

**आपला विश्वासू**

**(हर्षवर्धन सपकाळ)**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बुलडाणा

जलश्री,
जलशुध्दीकरण केंद्राचे आवारात
बुलडाणा - ४४३००१

फोन नं.०७२६२ - २४२४५७
फॅक्स नं.०७२६२ - २४२४५१
Email : eemjpbld@rediffmail.com

जावक क्रं.तांशा/ ५२२ /२०१५
महा.जीवन प्राधिकरण नागरी बुलडाणा
दिनांक :- २/५/२०१५

प्रति,
**मा. आमदार साहेब,**
बुलडाणा मतदार संघ
**बुलडाणा.**

**विषय :- बुलडाणा शहर पाणी पुरवठा योजना व इतर योजनेची माहिती.**

संदर्भ :- आपले कार्यालयीन पत्र क्रं. ३५७/२२ पुविमसं/२०१५ दि. २०.४.२०१५.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये बुलडाणा शहराचा नियमित पाणी पुरवठा वितरण करण्याच्या दृष्टीने व बुलडाणा शहरास वेळोवेळी उदभवलेल्या तिव्र पाणी टंचाईस मात करण्यासाठी शासना मार्फत वेळोवेळी राबविण्यात आलेल्या योजनाची माहिती पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. **तातडीची बुलडाणा पाणी पुरवठा योजना सन २००५ - २००६ (पेनटाकळी प्रकल्प)**
योजने अंतर्गत मुख्यत्व २०० मी.मी. व्यासाची डी.आय. के.-९ पाईप लाईन लांबी २५ कि.मी.
योजनेची मंजुर किंमत रु. ४०४.०५ लक्ष
योजनेवरील खर्च किंमत रु. ४०४.०५ लक्ष

२. **तातडीची बुलडाणा पाणी पुरवठा योजना सन २००९-२०१० (पेनटाकळी प्रकल्प)**
योजने अंतर्गत मुख्यत्व २०० मी.मी. व्यासाची डी.आय. के.-९ पाईप लाईन लांबी २५ कि.मी.
योजनेची मंजुर किंमत रु. ७३६.१३ लक्ष
योजनेवरील खर्च किंमत रु. ७३६.१३ लक्ष

३. **बुलडाणा शहर वितरण व्यवस्था सुधारणा (थ्री झोन)**
बुलडाणा शहरास नियमीत पाणी पुरवठा वितरण करण्याच्या दृष्टीने अस्तिवातील १२० भागाचे थ्री झोन निर्माण करुन अस्तित्वातील वितरण व्यवस्था मध्ये सुधारणा करुन नियमित पाणी पुरवठा योजना. नगर परिषद, बुलडाणा यांच्याकडून पुर्ण ठेव तत्वावर याविभागामार्फत राबविण्यात येत आहे. थ्री झोन अंतर्गत पाणी वितरण चाचणी दिनांक १९.४.२०१५ पासुन सुरुवात करण्यात आलेली आहे.
योजनेची मंजुर किंमत रु. १२८.१४ लक्ष
योजनेवरील प्राप्त निधी रु. १०१.१२ लक्ष
योजनेवीरल खर्च रु. ९४.८८ लक्ष
योजनेसाठी आवश्यक निधी रु. २७.०२ लक्ष

४. **बुलडाणा शहर व ४ गांवे पाणी पुरवठा योजना (उद्‌भव खडकपुर्णा प्रकल्प)**
बुलडाणा शहराचा भौगोलिक स्थितीचा विचार करता व नियमीत होणाऱ्या कमी पर्जन्यमानामुळे बुलडाणा शहरास पुरवठा होणाऱ्या येळगांव धरणामध्ये पुरेशा साठा उपलब्ध होत नसल्याने वेळोवेळी बुलडाणा शहरास तिव्र पाणी टंचाईस तोड द्यावे लागते. बुलडाणा शहराच्या परिसरात भुपृष्टीय शाश्वत स्त्रोत खडकपुर्णा धरणा शिवाय उपलब्ध नसल्याने शासनाकडुन बुलडाणा शहर

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बुलडाणा

ालश्री,
ालशुध्दीकरण केंद्राचे आवारात
ुलडाणा - ४४३००१

फोन नं.०७२६२ - २४२४५७
फॅक्स नं.०७२६२ - २४२४५१
Email : eemjpbld@rediffmail.com

//२//

१. योजनेचा पाणी पुरवठा दर - १३५ लि./प्रती माणशी/प्रती दिन

२. योजनेव्दारे संकल्पीत वर्ष (सन २०४३) उपलब्ध होणारे पाणी - ३१.२५ ~~मीमी३~~ एम.एल.डी.

**३. योजनेची कामे प्रगतीपथावर आहे.**

१. **भौतिक प्रगती - टप्पा -१** — **८०% पुर्ण**
(पुरवठा विहिर अशुध्द पाण्याची उर्ध्वनलिका, गुरुत्व नलिका, जलदाब भंजक टाकी)

**टप्पा -२** — **कामे सुरु केलेली नाही.**
(बुलडाणा शहरातील उंच पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था)

२. **आर्थिक प्रगती -** — **५५% खर्च पुर्ण**

| | |
|---|---|
| योजनेची मंजुर किंमत रु. | ११३.३२ कोटी |
| योजनेवर प्राप्त निधी रु. | ५८.४३ कोटी |
| योजनेवर खर्च रु. | ५८.४३ कोटी |
| योजनेसाठी आवश्यक निधी रु. | ३३.१० कोटी |
| नगर परिषद बुलडाणा सहभाग निधी प्राप्त होणे आवश्यक | १६.५५ कोटी |

वरिल प्रमाणे योजनेची माहिती सविनय सादर करण्यात येत आहे.

आपणास माहितीस्तव सादर.

कार्यकारी अभियंता,
महा.जीवन प्राधिकरण विभाग, बुलडाणा.

सहपत्र :- निरंक.

प्रत/-
१. मा. जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी, कार्यालय, बुलडाणा आपणास माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. मुख्याधिकारी नगर परिषद, बुलडाणा आपणास माहितीस्तव सस्नेह अग्रेषीत
३. उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, बुलडाणा आपणास माहितीस्तव सादर.

# बुलडाणा शहर पाणी पुरवठा योजना.
## पाहणी अहवाल

बुलडाणा शहर व परिसरातील ग्रामीण भागास होणारा पाणी पुरवठा येळगांव स्थित १९.२७ द.ल.घ.मी. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्रातून पाणी पुरवठा करण्यात येतो. येळगांव धरणातून गुरुत्वनलिके व्दारे येणारे पाणी अशुध्द पाण्याच्या संम्प व पंपगृहात मध्ये संकलीत करण्यांत येते. तेथे अशुध्द पाण्याचे ४० अश्वशक्तीचे दोन व्ही.टी. पंप कार्यान्वीत असून त्या व्दारे अशुध्द पाणी उचलण्यात येते. जलशुध्दीकरण केंद्राच्या एरियेशन फाउटेन येथे आलमचे प्रमाण प्रति/तास ४० किलो प्रमाणे पाण्यात मिसळण्यात येते परंतु क्लॅरिफायर पुर्ण पणे बंद स्थितीत असल्यामुळे बायपासचा वापर करुन पाणी फिल्टर बेडच्या तिन ब्लॉक व्दारे पाणी शुध्द पाण्याच्या सम्प मध्ये संकलित करण्यात येते. या दरम्यान पाण्यामध्ये क्लोरिंग गॅस ९०० किलो प्रति/महिना या प्रमाणे व ब्लिचिंग पावडर ४० किलो प्रति/दिवस वापरण्यात येतो. येथे क्लोरिंग गॅस/ब्लिचिंग पावडर पाण्यात मिसळण्यास लागणाऱ्या मोजमाप यंत्रसामुग्री नादुरुस्त स्थितीत आहे. याची दुरुस्ती नविन यंत्रसामुग्री बसविणे आवश्यक आहे.

जलशुध्दीकरण केंद्राच्या फिल्टर बेड दररोज बॅक वॉश करण्यांत येत आहे. यातील फिल्टर मेडिया बेड ची आवश्यक ती काळजी घेण्यात येत असल्याचे निर्देशनास आले. येथिल पाण्याची रासायनिक तपासणी नियमित नोंदी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच लॅबची नव्याने उभारणी करणे आवश्यक आहे.

जलशुध्दीकरण केंद्राच्या शुध्द पाण्याचा सम्प व पंप गृहात २२५ एच.पी. चे २ नग पंपाव्दारे पाणी उचलण्याची क्षमता प्रती पंप २७५००० लक्ष लिटर्स प्रमाणे एकुण पंपींग तास प्रति दिवस साधारण १६ तास प्रमाणे पाणी उपसण्यात येते. शुध्द पाण्याच्या उर्ध्वनलिकेव्दारे शहरातील पुढील प्रमाणे पाणी साठवण क्षमता असलेल्या उंच पाण्याच्या टाकी मध्ये शुध्द पाण्याचे संकलन करण्यात येते.

शहरातील पाणी साठवण क्षमता :-

१. २५.०० लक्ष लिटर्स (म.जी.प्रा कार्यालयाच्या परिसरात स्थित)
२. ११.०० लक्ष लिटर्स (म.जी.प्रा कार्यालयाच्या परिसरात स्थित)
३. १०.०० लक्ष लिटर्स (सोळंके ले-आऊट परिसरात स्थित)

बुलडाणा शहरास नियमित पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचे तिन झोन निर्माण करुन सन २०१०-११ दरम्यान कामे हाती घेण्यात आली. त्यावेळेस झोन क्रं.१ ची कामे पुर्ण करण्यांत आली व झोन क्रं. २ ची कामे हाती घेतली परंतु नगर परिषद, बुलडाणा यांच्याकडून निधी वितरणास विलंब झाल्याने मुळ संबधीत कंत्राटदाराने देयका अभावी कामे बंद केली. एक ते दिड वर्षाच्या दरम्यानच्या कालावधीत वारंवार, प्रत्यक्ष निधी मागणीचा पाठपुरावा केल्यानंतरच नगर परिषद, बुलडाणा यांनी ही झोनच्या कामासाठी निधी या कार्यालयाकडे जमा केला परंतु मुळ कंत्राटदाराने परत कामे सुरु करण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे मुळ कंत्राटदाराकडून कामे काढून घेण्यात आली. अतिरिक्त कंत्राटदाराची नेमणूक करण्यात येऊन कामे पुर्ण करण्यास सुरु केली

सद्यस्थितीत शहरातील वाढवलेला भाग, नव्याने निर्माण झालेल्या कॉलन्या, गेल्या चार ते पाच वर्षांमध्ये वितरण व्यवस्थे मध्ये PVC Pipe लाईन टाकल्याने झालेली वाढ, शहरातील नव्याने निर्माण झालेली कॉक्रीट रस्ते, अशा कारणाने कामाची वाढ झाली या मुळे शहरातील संकल्पीत लोकसंख्या गृहित धरुन साठवण क्षमता वाढवावी लागणार आहे. याचा समावेश बुलडाणा शहर व ४ गांवे पाणी पुरवठा योजना उद्भव खडकपुर्णा प्रकल्प या योजनेत समावेश करण्यात आलेला आहे. याची क्षमता पुढील प्रमाणे आहे.

१. १३.०० लक्ष लिटर्स
२. १०.०० लक्ष लिटर्स

वरील जलशुध्दीकरण केंद्र व शहरातील साठवण क्षमतेचा सर्व बाबी बाबत नगर परिषद, बुलडाणा संबंधित अभियंता, यांच्याशी चर्चा केली असुन निदर्शनास आलेलया बाबीचा समावेश सुजल निर्मल योजने अंतर्गत कामे प्रस्तावित करण्यात आलेले असलचे कळाले.

तसेच यांत्रिकी उपकरणांचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

१. अशुध्द पाण्याचे ४० अश्वशक्तीचे तिन व्ही.टी पंपापैकी एक पंप नादुरुस्त आहे पंपाची मोटर दुरुस्तीसाठी काढुण ठेवलेली असुन दुरुस्तीचे कामे सुरु आहे. तिन पैकी दोन पंप एकाच वेळी चालवायेचे असल्यामुळे पुरेशी स्टँडबॉय अरेंजमेंट उपलब्ध नाही. त्यामुळे नंतरची दुरुस्ती त्वरीत करणे आवश्यक आहे.
२. जलशुध्दीकरण केंद्रातील फ्लॅश मिक्स पुर्णतः बंद आहे व त्याची संपुर्ण दुरुस्ती आवश्यक आहे. जलशुध्दीकरण केंद्रातील पाण्याची गुणवत्ता योग्य राखण्याकरीता फ्लॅश मिक्सर नेहमीच चालु ठेवणे आवश्यक आहे.
३. जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरिफायर वरील ब्रिज हा स्क्रॅपर तुटल्यामुळे पुर्णपणे बंद आहे. तसेच ब्रिज वरील दोन्ही फ्लॉकुलेटर सुध्दा पुर्णपणे बंद आहे. सर्वच उपकरणांची दुरुस्ती आवश्यक आहे. जलशुध्दीकरण केंद्रातील पाण्याची गुणवत्ता योग्य राखण्याकरीता ब्रिज व फ्लॉकुलेटर नेहमीच चालु ठेवणे आवश्यक आहे.
४. जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर बेडची वाळुची चाचणी घेऊन ती बदलणे आवश्यक वाटते रेट ऑफ फ्लो मिटर, हेड लॉस मिटर बंद आहे. त्यामुळे फिल्टर वॉश आऊट करण्याचा कालावधी नक्की लक्षात येत नाही.
५. जलशुध्दीकरण केंद्रातील तुरटी व विरंजक चुर्ण यांच्या टाक्यावरील इले. मोटर, गिअर बॉक्स व पॅनल पुर्णपणे बंद आहे. त्यामुळे योग्य मात्रेत ॲलम अथवा ब्लिचींग वापरल्या जातो की नाही हे निश्चित होत नाही.
६. जलशुध्दीकरण केंद्रावरील वॉश वॅटरचा एक पंप दुरुस्तीसाठी घेऊन गेल्याचे दिसुन आले त्यामफहे वॉश वॅटर पंपासाठी तुर्त स्टॅण्डबाय उपलब्ध नाही त्यामफहे Filter वॉश आऊट चे काम खोळंबु शकते.
७. Air Blower दोन्ही सुरु आहेत.

८. शुध्द पाण्याच्या २२५ अश्वशक्तीच्या तिन व्हीटी पंपा पैकी पं क्रं. २ ची इले. मोटर दुरुस्तीस घेउन गेल्याचे दिसुन आले. तिन पैकी दोन पंप एकाच वेळी चालवायचे असल्यामुळे पुरेशी स्टँडबॉय अरेंजमेंट उपलब्ध नाही. त्यामुळे नंतरची दुरुस्ती त्वरित करणे आवश्यक आहे.

९. सबस्टेशन मधील ट्रान्सफॉर्मर मधून ऑईल गळते असे निदर्शनास आले तरी ट्रान्सफॉर्मर तसेच सबस्टेशनचे सर्वसाधारण मेंन्टेनस करणे आवश्यक वाटते.

१०.संपुर्ण जलशुध्दीकरण केंद्रात स्वच्छता राखणे आवश्यक आहे.

जलशुध्दीकरण केंदाच्या पाहणी वरुन असे निदर्शनास येते की, तेथील यांत्रिकी उपकरणांची दुरुस्ती करुन त्यांचे नुतनीकरण करणे आवश्यक वाढते जणे करुन जलशुध्दीकरण प्रक्रिया योग्य तऱ्हेने होवून पाणची गुणवत्ता योग्य राखणे शक्य होइल.

नगर परिषद, बुलडाणाच्या संबंधीत अभियंता यांचेशी चर्चा केली असता. उपरोक्त निर्देशित कामे या आधीच नगर परिषद तर्फे सादर करण्यांत आलेल्या सुजल निर्मल योजने अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली असल्याचे कळले.

उपविभागीय अधिकारी,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
उपविभाग, बुलडाणा.

क्रमांक कावि/कलि-2/सा.आ/47/2016
उपविभागीय अधिकारी कार्यालय
बुलडाणा दिनांक :-03.02.2016

प्रति,

मा.जिल्हाधिकारी,
बुलडाणा

विषय :- बुलडाणा शहरातील पाणी पुरवठा योजनेच्या चौकशीबाबत.

संदर्भ :-1.आपले पत्र क्रमांक.न.वि.शा/डे-6/सी.आर.154/2810/2015 दि.01.10.2015
2.मा.आमदार श्री.हर्षवर्धन सपकाळ,बुलडाणा यांचे पत्र दिनांक-18/09/2015

-----000----

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये बुलडाणा शहरातील पाणी पुरवठा नियमीत व सुरळीत करणेबाबत उपविभागीय अधिकारी,बुलडाणा,कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा प्रशासन अधिकारी,न.वि.शा.जि.का.बुलडाणा या समिती द्वारे मुद्देनिहाय चौकशी करुन अहवाल सोबत सादर करण्यात येत आहे.

सहपत्र:- पाणी पुरवठा बाबतचा अहवाल

स्वा/-
उपविभागीय अधिकारी,
बुलडाणा

प्रतिलीपी :- मा.आमदार श्री.हर्षवर्धन सपकाळ,शास्त्रीनगर,मुठे ले आउट,बस स्टॅंड मागे, बुलडाणा यांना माहीतीस्तव सादर.

4/2

उपविभागीय अधिकारी,
बुलडाणा

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अकोला

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बुलडाणा

# बुलडाणा शहर वितरण व्यवस्था

## मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांच्या निर्देशानुसार

## त्रिसदस्यीय पाहणी अहवाल.

१. उपविभागीय अधिकारी, बुलडाणा

२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलडाणा.

३. जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास विभाग, जि.का. बुलडाणा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना विभाग,बुलडाणा

बुलडाणा शहर वितरण व्यवस्था

ता. बुलडाणा जि. बुलडाणा

## त्रिसदस्यीय पाहणी अहवाल.

बुलडाणा शहरास दररोज पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणाच्या उपाय योजना करण्यासंबंधी दि.२४.४.२०१० रोजी चिखली येथे मा.पालकमंत्री, बुलडाणा यांनी दिलेल्या सुचनेनुसार व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार बुलडाणा शहरातील अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने हायड्रॉलिक मॉडेल तयार करुन त्याआधारे अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचे १२० झोनचे रुपांतर ३ झोनमध्ये करुन शहरास दररोज पाणी पुरवठा करण्याचे नियोजन होते.

बुलडाणा शहरातील अस्तित्वातील वितरण व्यवस्थेचे तिन झोन निर्माण करण्यासाठी रु.७४.८६ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकास अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.मंडळ, अकोला यांनी तांत्रिक मंजुरी प्रदान केली.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा.अकोला यांचे पत्र क्रं.२३०/११ दि.२०.१.२०११ अन्वये तांत्रिक मंजुरी प्रदान केली.

अंदाजपत्रकीय किंमत रु.६३.७१ लक्ष (निव्वळ)

१७.५% ETP charges रु.११.१५ लक्ष

---

एकूण रु.७४.८६ लक्ष (ढोबळ)

२. प्रशासकीय मान्यता नगर परिषद, बुलडाणा यांचा ठराव क्रं. १ दि. २७.१२.२०१० अन्वेय प्रदान केलेली आहे.

२) निविदेची माहिती

Cost put to Tender : Rs.४९,२२,१८२/-

Accepted Tender Cost : Rs.६३,२५,००४/- (२८.५०% Above)

करारनामा क्रं.बी १/१३ सन २०१०-११

कालावधी ६ महिने Upto २०.८.२०११ पर्यंत

कार्यारंभ आदेश क्रं.३७८/२०११ दि.२१.२.२०११

नगर परिषद, बुलडाणा यांच्याकडून पूर्णठेवे तत्वावर सदरील काम म.जी.प्रा.मार्फत करण्यांत येत आहे. या कामा करीता नगर परिषद, बुलडाणा यांनी प्रथम हप्त्यापोटी रु.३५.०० लक्ष निधी शेषफंडातुन प्रदान केलेला आहे. (नगर परिषद, बुलडाणा कडून पूर्ण ठेव तत्वावर दि.१२.१.२०११ रोजी रु.२०.०० लक्ष व पुर्वी १०.०० लक्ष नंतर ५.०० लक्ष असे रु.३५.०० लक्ष मिळाले.)

नगर परिषद, बुलडाणा यांनी रु.४०.०० लक्ष निधी उपलब्धतेकरीता पाणी टंचाई आढावा सभा दि.३१.३.२०१२ रोजी मा.पालकमंत्री, बुलडाणा यांच्याकडे मागणी केली. सदरील निधी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने मा.आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे पत्र क्रं.विआस/प्रासंनप्र/सलेअ/४३/२०१२ दि.३१ मे २०१२ अन्वये शासनास मागणी केली होती. परंतु निधी प्राप्त झालेला नाही.

बुलडाणा शहरातील झोन क्रं.१ (चैतन्यवाडी वार्ड क्रं. १८,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७ असे एकुण वार्ड -९ अंतर्गत एकुण लोकसंख्या ३१९५६) भाग अष्टविनायक नगर, फॉरेस्ट कॉलनी, वैकुंठ धाम रोड, लक्ष्मी नगर, सरस्वती नगर, महावीर नगर, केशव नगर, एकता नगर, जिल्हा परिषद कॉलनी, शिंगणे सोसायटी, जिजामाता नगर, लांडे लेआऊट, सक्युलर रोड, लहासे सोसायटी, खिरोडकर गल्ली, विष्णु

बाडी, कर्मचारी वसाहत पाळणा घर, सदाफुली नगर, राम मंदीर या भागामध्ये आवश्यक ठिकाणी नविन पाईप लाईन वाढविणे, पाईप लाईनवरील गळती थांबविणे, लिकेजेस काढणे, नविन व्हॉल बसविणे, व्हॉलची दुरुस्ती करणे क्रॉस कनेक्शन करणे इत्यादी कामे पूर्ण करुन दि.१२.४.२०११ ते १.७.२०११ पर्यंत दररोज पाणी पुरवठा करण्यांत आला. या कामापोटी

प्रथम देयक रु.२४.७९ लक्ष (अदा करण्यांत आले आहे.)

दुसरे देयक रु.१५.८० लक्ष (अदा करण्यांत आलेले आहे.)

खर्च रु.४०.५९ लक्ष

तसेच झोन क्र.३ ची कामे हाती घेण्यांत आली. परंतु निधी अभावी कंत्राटदाराने कामे बंद केली.

बुलडाणा शहरातील वितरण व्यवस्थेच्या कामाची आवश्यकता व निकड लक्षात घेता झोन क्र.२, झोन क्र.३ ची कामे पूर्ण करण्यासंबंधी मा.आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दि.२१.२.२०१३ रोजी झालेल्या पाणी टंचाई आढावा सभेत दिलेल्या निर्देशानुसार वितरण व्यवस्थेची कामे पूर्ववत करण्यासाठी नविन दरसुची नुसार रु.१२८.१४ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले

प्रशासकीय मान्यता :-

मा.जिल्हाधिकारी, बुलडाणा पत्र क्र. भावे/नपाप्र/कक्ष-९८२१/डेल्स-४/५३७/१३ दि ५/१०/२०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

तांत्रिक मान्यता :-

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना विभाग, बुलडाणा. यांचे पत्र क्रं. २१९७/११ दि. १३.११.२०१४ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान.

नगर परिषद बुलडाण्याकडे वेळो वेळी मागणी करण्यात आली परंतु विलंबनाने दिनांक १४.२.२०१४ रोजी रु. ६६.१३ लक्ष निधी मजीप्रा कडे जमा केलेला आहे. या विलंबनामुळे मुळ कंत्राटदाराने कामे परत सुरुवात करण्यात टाळाटाळ केली. त्यामुळे मा. अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

(ना. व ग्रा.) योजना मंडळ, अकोला यांचे आदेश दिनांक ३१.१०.२०१४ पासुन त्यांच्याकडुन कामे काढून घेण्यात आली.

नगर परिषद बुलढाणा यांचे कडुन १४.२.२०१४ रोजी रु. ६६.१३ लक्ष निधी प्राप्त झाला या आधारे नव्याने निविदा प्रक्रीया राबवुन

१. मा. अध्यक्ष नगर परिषद, बुलढाणा यांच्या सुचने नुसार क्रिडा संकुल रोड भागात २०० मी.मी./१०० मीमी व्यासाची पी.व्ही.सी. पाईप लाईन टाकण्यात आली.

निविदेची माहिती.

| | | |
|---|---|---|
| Cost put to Tender | : | Rs.९२१८००/- |
| Accepted Tender Cost | : | Rs.९४०२३६/- (२% Above) |

करारनामा क्रं.बी १/४ सन २०१४-१५

कालावधी ३ महिने Upto २०.११.२०१४ पर्यंत

कार्यारंभ आदेश क्रं.१७३६/२०१४ दि.२१.८.२०१४

या निविदेची कामे पुर्ण झाली आहे.

२. बी झोन अंतर्गत ची उर्वरीत कामे होण्याच्या दृष्टीने दुसऱ्या कंत्राटदाराची नेमनुक करण्याची निविदा प्रक्रीया राबविण्यात आली.

निविदेची माहिती.

| | | |
|---|---|---|
| Cost put to Tender | : | Rs.६१९९६५२/- |
| Accepted Tender Cost | : | Rs.६३१६५०६/- (२% Above) |

करारनामा क्रं.बी १/६ सन २०१४-१५

कालावधी ६ महिने Upto १.०७.२०१५ पर्यंत

कार्यारंभ आदेश क्रं.१७/२०१५ दि.२.१.२०१५

या आधारे नविन कंत्राट दारा मार्फत कार्यारंभ आदेशान्वये दिनांक २.१.२०१५ पासुन झोन क्रं. ३ स... ले-आऊट वार्ड न. १०,११,१२,१३,१४,१५,१६,१७ एकुण वार्ड-८ अंतर्गत एकुण लोकसंख्या १२९८७) ची कामे हाती घेऊन गणेश नगर कऱ्हाळे ले-आऊट गुलाबचंद नगर, भिलवाडा, सोळुंके ले आऊट वावरे लेआऊट, विदर्भ हाऊसिंग सोसायटी, वानखेडे ले आऊट, आरास ले आऊट, भडेच ले आऊट, राऊत वाडी, आदर्श नगर, सुर्योदय नगर, इंदीरा नगर, मच्छि ले आऊट, क्रिडा संकुल रोड, राजमाता चौक ते भिलवाडा दरम्यान डि.आय. के.७ पाईप लाईन टाकणे व इतर भागातील आवश्यक ठिकाणी नविन पाईप लाईन टाकणे, पाईप लाईन वर लिकेजेस काढणे, हॉल बसविणे लिकेज काढणे, व्हॉल दुरुस्त करणे क्रॉस कनेक्शन करणे इत्यादी कामे करण्यात आली. या भागाची संयुक्त पाहणी मा. अध्यक्ष नगर परिषद, बुलडाणा स्थानिक नगर सेवक लोकप्रतिनीधी व मा. कार्यकारी अभियंता यांच्या ... दि. १६.१.२०१५ रोजी करण्यात आली.

तसेच झोन क्रं-२ (जुनागाव वार्ड नं. १,२,३,४,५,६,७,८,९,१९ एकुण वार्ड-१० अंतर्गत एकुण लोकसंख्या २४१९९) अंतर्गत भिम नगर, मिर्झा नगर, डोंगरे चौक, इक्बाल चौक, टिपुसुलतान चौक, तेलगुनगर, सराफा लाईन, उर्दु स्कुल, मजिद भाग, शिवनेरी नगर या भागामध्ये आवश्यक ठिकाणी नविन पाईप लाईन वाढविणे, पाईप लाईनवरील गळती थांबविणे, लिकेजेस काढणे, नविन व्हॉल बसविणे, व्हॉलची दुरुस्ती करणे क्रॉस कनेक्शन करणे इत्यादी कामे करण्यात आली.

योजनेच्या करारनाम्या अंतर्गत थी झोन मध्ये दि. १७.४.२०१५ ते १.७.२०१५ या कलावधीत नियमित पाणी पुरवठा करण्यात आला.

निधी बाबतची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| . | कामाची एकुण किंमत | प्राप्त निधी | झालेला खर्च |
|---|---|---|---|
| | *२८.१४ लक्ष | दि. १२.१.२०११ रोजी रु. ३५.०० लक्ष<br>दि. १४.२.२०१४ रोजी रु. ६६.१३ लक्ष<br>दि. १२.६.२०१५ रोजी रु. २७.०१ लक्ष<br>एकुण रु. १२८.१४ लक्ष | १. करारनामा क्रं. १/१३ सन १०-११ रु. ४०.५१लक्ष<br>२. करारनामा क्रं. १/४ सन १४-१५ रु. ९.४० लक्ष<br>३. करारनामा क्रं. १/६ सन १४-१५ रु. ५४.८९ लक्ष<br>एकुण झालेला खर्च रु. १२८.१४ लक्ष (ई.टी.पी. चार्जेस सह) |

...य मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग, अमरावती यांनी दिनांक ८.२०... रोजी श्री झोन अंतर्गतच्या कामाची प्रत्यक्ष मौका पाहणी व नळ धारकांशी प्रत्यक्ष ...गाबाबत, पाणी वितरणाबाबत चौकशी केलेली आहे.

मा. सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण एक्सप्रेस टॉवर्स मुंबई यांचे दिनांक २५.८.२०१५ ...ी आढावा बैठकीत बुलडाणा शहर वितरण व्यवस्था श्री झोन अंतर्गत ७ दिवस दैनंदिन पाणी पुरवठा ...ण्याचे निर्देश दिले त्यानुसार दिनांक २.९.२०१५ पासुन ते दिनांक १०.९.२०१५ या कालावधीत दैनंदिन ...व्यीत्या पाणी पुरवठा करण्यांत आला आहे.

बुलडाणा शहर वितरण व्यवस्था श्री झोन पाणी वितरण, देखभाल, दुरुस्तीची जबाबदारी दिनांक ...९.२०१५ पासुन नगर परिषद, बुलडाणा यांच्याकडे देण्यात आली आहे.

**मा. आमदार श्री. हर्षवर्धन सपकाळ बुलडाणा यांचे पत्र दि. १८.९.२०१५ अन्वये बुलडाणा ...ातील पाणी वितरण पुरवठा योजनेच्या अनुषंगाने बुलडाणेकरांना नियमित सुरळीत पाणी पुरवठा ...ण्याच्या दृष्टीने उपस्थित केलेल्या मुद्देनिहाय चौकशी** करीता मा. जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे पत्र क्रं.

नविशा/डे-६/सी.आर १६४/२८१०/२०१५ दि. १.१०.२०१५ अन्वये मुद्यानिहाय पाहणी चौकशी अहवालासाठी १) उपविभागीय अधिकारी, बुलडाणा २) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बुलडाणा ३) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर विकास विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा. यांची त्रिसदसीय समिती गठीत करण्यांत आली असुन समितीचा मुद्यानिहाय अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

**मुद्दा क्रं. १ :- उपलब्ध जलसाठा व शहराच्या वार्षिक पाणी पुरवठ्याची आवश्यकता.**

बुलडाणा शहर व परिसरात अस्तीत्वातील येळगांव धरणावरुन पाणी पुरवठा करण्यांत येतो सन २०१५-१६ या वर्षाच्या पावसाळ्यात योग्य प्रमाणात पर्जन्यमान झाल्यामुळे धरणामध्ये पूर्णक्षमतेने पाणी साठा उपलब्ध झालेला आहे.

| | | |
|---|---|---|
| येळगांव धरणाची एकुण साठवण क्षमता | - | १२.४० मी.मी.३ |
| जिवंत साठा | - | १०.०० मी.मी.३ |
| मृत साठा | - | २.४० मी.मी.३ |

| | | |
|---|---|---|
| बुलडाणा शहर व परिसरात आवश्यक वार्षिक पाणी पुरवठा (८००००+२०००० लोकसंख्या) | - | २.५५ मी.मी.३ |
| पाणी वितरणातील लॉसेस | - | ०.५३ मी.मी.३ |
| एकुण वार्षिक पाणी पुरवठा | - | ३.०८ मी.मी.३ |

**मुद्दा क्रं.२ :- पाणी उपसा करणाऱ्या यंत्रणेची क्षमता व साठवण क्षमता**

योजने अंतर्गत येळगांव धरण स्थित जलशुध्दीकरण केंद्र १०.२० द.ल.ली. क्षमतेचा आहे. अनुक्रमे २५.०० लक्ष, १०.०० लक्ष व ११.०० लक्ष असे एकुण ४६.०० लक्ष लि. पाणी साठवण क्षमता आहे.

मुद्दा क्र. ३ :- शुध्दीकरणाच्या उपयायोजना व सद्यस्थिती.

जलशुध्दीकरण केंद्राची पाहणी दरम्यान पुढील बाबी निर्देशनास आलेल्या आहेत.

बुलढाणा शहर व परिसरातील ग्रामीण भागास होणारा पाणी पुरवठा येळगांव स्थित ११.१७ द.ल.ली. क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्रातुन पाणी पुरवठा करण्यात येतो. येळगांव धरणातुन गुरुत्वनलिके व्दारे येणारे पाणी अशुध्द पाण्याच्या संम्प व पंपगृहात मध्ये संकलीत करण्यांत येते. तेथे अशुध्द पाण्याचे ४० अश्वशक्तीचे दोन व्ही.टी. पंप कार्यान्वीत असून त्या व्दारे अशुध्द पाणी उपसण्यात येते. जलशुध्दीकरण केंद्राच्या एरियेशन फाऊंटेन येथे अलमचे प्रमाण प्रति/तास ४० किलो प्रमाणे पाण्यात मिसळण्यात येते परंतु क्लॅरिफायर पुर्ण पणे बंद स्थितीत असल्यामुळे बायपासचा वापर करुन पाणी फिल्टर बेडच्या तिन ब्लॉक व्दारे पाणी शुध्द पाण्याच्या सम्प मध्ये संकलित करण्यात येते. या दरम्यान पाण्यामध्ये क्लोरिन गॅस १०० किलो प्रति/महिना या प्रमाणे व ब्लिचिंग पावडर ४० किलो प्रति/दिवस वापरण्यात येते. येथे क्लोरिन गॅस/ब्लिचिंग पावडर पाण्यात मिसळण्यास लागणाऱ्या मोजमाप यंत्रसामुग्री नादुरुस्त स्थितीत आहे. याची दुरुस्ती नविन यंत्रसामुग्री बसविणे आवश्यक आहे.

जलशुध्दीकरण केंद्राच्या फिल्टर बेड दररोज बॅक वॉश करण्यात येत आहे. यातील फिल्टर मेडिया बेड ची आवश्यक ती काळजी घेण्यात येत असल्याचे निर्देशनास आले. येथिल पाण्याची रासायनिक तपासणी नियमित नोंदी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. तसेच लॅबची नव्याने उभारणी करणे आवश्यक आहे.

जलशुध्दीकरण केंद्राच्या शुध्द पाण्याचा सम्प व पंप गृहात २२५ एच.पी. चे २ नग पंपाव्दारे पाणी उपसण्याची क्षमता प्रती पंप ३७५००० लक्ष लिटर्स प्रमाणे एकुण पंपींग तास प्रति दिवस साधारण १६ तास प्रमाणे पाणी उपसण्यात येते. शुध्द पाण्याच्या उर्ध्वनलिकेव्दारे शहरातील पुढील प्रमाणे पाणी साठवण क्षमता असलेल्या उंच पाण्याच्या टाकी मध्ये शुध्द पाण्याचे संकलन करण्यात येते.

शहरातील पाणी साठवण क्षमता :-

१. २५.०० लक्ष लिटर्स (म.जी.प्रा कार्यालयाच्या परिसरात स्थित)
२. ११.०० लक्ष लिटर्स (म.जी.प्रा कार्यालयाच्या परिसरात स्थित)
३. १०.०० लक्ष लिटर्स (सोळंके ले-आऊट परिसरात स्थित)

**वरील जलशुध्दीकरण केंद्र व शहरातील साठवण क्षमतेचा सर्व बाबी बाबत नगर परिषद, बुलढाणा संबंधित अभियंता, यांच्याशी चर्चा केली असुन निदर्शनास आलेल्या बाबीचा समावेश सुजल निर्मल योजने अंतर्गत कामे प्रस्तावित करण्यात आलेले असल्याचे कळाले.**

तसेच यांत्रिकी उपकरणांचा अहवाल पुढील प्रमाणे आहे.

१. अशुध्द पाण्याचे ४० अश्वशक्तीचे तिन व्ही.टी पंपापैकी एक पंप नादुरुस्त आहे पंपाची मोटर दुरुस्तीसाठी काढुण ठेवलेली असुन दुरुस्तीचे कामे सुरु आहे. तिन पैकी दोन पंप एकाच वेळी चालवायेचे असल्यामुळे पुरेशी स्टँडबॉय अरेंजमेंट उपलब्ध नाही. त्यामुळे नंतरची दुरुस्ती त्वरीत करणे आवश्यक आहे.
२. जलशुध्दीकरण केंद्रातील फ्लॅश मिक्स पुर्णत: बंद आहे व त्याची संपुर्ण दुरुस्ती आवश्यक आहे. जलशुध्दीकरण केंद्रातील पाण्याची गुणवत्ता योग्य राखण्याकरीता फ्लॅश मिक्सर नेहमीच चालु ठेवणे आवश्यक आहे.
३. जलशुध्दीकरण केंद्रातील क्लॅरिफायर वरील ब्रिज हा स्क्रॅपर तुटल्यामुळे पुर्णपणे बंद आहे. तसेच ब्रिज वरील दोन्ही फ्लॉकुलेटर सुध्दा पुर्णपणे बंद आहे. सर्वच उपकरणांची दुरुस्ती आवश्यक आहे. जलशुध्दीकरण केंद्रातील पाण्याची गुणवत्ता योग्य राखण्याकरीता ब्रिज व फ्लॉकुलेटर नेहमीच चालु ठेवणे आवश्यक आहे.
४. जलशुध्दीकरण केंद्रातील फिल्टर बेडची वाळुची चाचणी घेऊन ती बदलणे आवश्यक वाटते रेट ऑफ फ्ली मिटर, हेड लॉस मिटर बंद आहे. त्यामुळे फिल्टर वॉश आऊट करण्याचा कालावधी नक्की लक्षात येत नाही.
५. जलशुध्दीकरण केंद्रातील तुरटी व विरंजक चुर्ण यांच्या टाक्यावरील इले. मोटर, गिअर बॉक्स व पॅनल पुर्णपणे बंद आहे. त्यामुळे योग्य मात्रेत ॲलम अथवा ब्लिचींग वापरल्या जातो की नाही हे निश्चित होत नाही.
६. जलशुध्दीकरण केंद्रावरील वॉश वॉटरचा एक पंप दुरुस्तीसाठी घेऊन गेल्याचे दिसुन आले त्यामफहे वॉश वॉटर पंपासाठी तुर्त स्टॅण्डबाय उपलब्ध नाही त्यामफहे Filter वॉश आऊट चे काम खोळंबु शकते.
७. Air Blower दोन्ही सुरु आहेत.
८. शुध्द पाण्याच्या २२५ अश्वशक्तीच्या तिन व्हीटी पंपा पैकी पं क्रं. २ ची इले. मोटर दुरुस्तीस घेउन गेल्याचे दिसुन आले. तिन पैकी दोन पंप एकाच वेळी चालवायचे असल्यामळे परेशी स्टँडबॉय अरेजमेंट उपलब्ध नाही. त्यामुळे नंतरची दुरुस्ती त्वरित करणे आवश्यक आहे.
९. सबस्टेशन मधील ट्रान्सफॉर्मर मधून ऑईल गळते असे निदर्शनास आले तरी ट्रान्सफॉर्मर तसेच सबस्टेशनचे सर्वसाधारण मेंन्टेनस करणे आवश्यक वाटते.
१०. संपुर्ण जलशुध्दीकरण केंद्रात स्वच्छता राखणे आवश्यक आहे.

जलशुध्दीकरण केंद्राच्या पाहणी वरुन असे निदर्शनास येते की, तेथील यांत्रिकी उपकरणांची दुरुस्ती करुन त्यांचे नुतनीकरण करणे आवश्यक वाढते जणे करुन जलशुध्दीकरण प्रक्रिया योग्य तऱ्हेने होवून पाणची गुणवत्ता योग्य राखणे शक्य होइल.

नगर परिषद, बुलढाणाच्या संबंधीत अभियंता यांचेशी चर्चा केली असता. उपरोक्त निर्देशित कामे या आधीच नगर परिषद तर्फे सादर करण्यांत आलेल्या सुजल निर्मल योजने अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली असल्याचे कळले.

मुद्दा क्र. ४ व ५ :- एकुण नळ कनेक्शनची संख्या व त्याची पाणी वितरण क्षमता. (लिटरमध्ये) व गळतीचे प्रमाण व त्याची कारणे.

| | | |
|---|---|---|
| शहरातील नळ कनेक्शनची संख्या | - | ९८५१ |
| ग्रामीण भाग | - | ५०६ |
| एकुण संख्या | - | १०३५७ |
| यांची पाणी वितरण (६००० लि. प्रमाणे) क्षमता | - | ६२.१४ लक्ष लि. |
| शहरातील पाणी पुरवठा योजने मध्ये पाणी उचल ते पाणी वितरण यामधील योजनेतील गळती | - | २१% |

मुद्दा क्र. ६ व ७ :- झोन क्र २ पाणी पुरवठा योजनेच्या अडचणी व उपाययोजना व सद्यस्थितीत अगामी काळाकरीता उपाय योजना.

शहरातील झोन २ मध्ये सद्यस्थितीत शहरातील वाढविलेला भाग, नव्याने निर्माण झालेल्या कॉलन्या, गेल्या चार ते पाच वर्षामध्ये वितरण व्यवस्थे मध्ये PVC Pipe लाईन टाकल्याने झालेली घाण, शहरातील नव्याने निर्माण झालेली कॉंक्रीट रस्ते इत्यादी अडचणी तसेच या झोन क्र-२ मध्ये योजनेवर उपलब्ध निधी लक्षात घेता आवश्यक ठिकाणी पि.व्ही.सी. पाईप लाईन टाकण्यात आली. क्रॉस कनेक्शन करणे, व्हॉल बसविणे, पाईप लाईनवरील गळती थांबविणे व्हॉल दुरुस्ती करणे इत्यादी कामे करण्यात आली. झोन क्र. २ मध्ये सुटसुटीत पणे पाणी वितरण होण्याच्या दृष्टीने १० लक्ष लिटर्स क्षमतेच्या टाकीपासुन ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत स्वतंत्रपणे पाईप लाईन टाकणे आवश्यक तथा काही ठिकाणी वितरण व्यवस्था पाईप लाईन टाकणे व तसेच कारंजा चौकात १३ लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी उभारणे इत्यादी कामाकरीता साधारणत: पुढील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | १३.०० लक्ष लिटर्स टाकी ------------------- | रु. ८०.०० लक्ष |
| २. | आवश्यक वितरण व्यवस्था (पाईप किमती सह ) --------------------------- | रु. ११५.३० लक्ष |
| एकुण | | रु. १९५.३० लक्ष |

मुद्दा क्रं. ८ :- **एकुण खर्च**

बुलडाणा शहराची पाणी वितरण व्यवस्थेची दैनंदिन, देखभाल व दुरुस्ती, पाणी पट्टी वसुली नगर परिषद, बुलडाणा मार्फत करण्यांत येती.


मुद्दा क्रं. ९ :- **इतर आवश्यक बाबी**


शहरातील थ्री झोन अंतर्गत पाणी वितरण करतांना नळ धारकामार्फत इलेक्ट्रीकल मोटारव्दारे पाणी उचलण्यात येत आहे. म्हणुन या कालावधीत पाणी वितरण होणाऱ्या भागात विद्युत पुरवठा खंडीत करण्यांत यावा. तसेच प्रत्येक नळ धारकाला मिटरव्दारे पाणी पुरवठा करावा लागेल जेणे करुन पाण्याचा अपव्यय तथा अवैध नळ जोडणी पायबंद घालणे शक्य होईल.

**जिल्हा प्रशासन अधिकारी,**
नगर विकास विभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय,
बुलडाणा

**कार्यकारी अभियंता, प्रभारी**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग,
बुलडाणा.

३०।१।२०११
**उपविभागीय अधिकारी,**
बुलडाणा.


WARD NO. 10,1 ... 13,14,15,16,17
TOTAL 8 NOS P... LATION 22987
PIPE LINE WORK
M.J.P DIVISION BULDANA
BULDANA CITY DISTRIBUTATION SYSTEM
NETWORK
DRY BY
CHED BY
TRAED BY
S.D.E
E.S.R
CPA. 11.0 LAKHA LITS
FOR ZONE III
E.S.R
CPA. 10.0 LAKHA LITS
FOR ZONE - II
E.S.R
CPA. 25.0 LAKHA LITS
FOR ZONE - I
BULDANA URBAN REGENCY CLUB
SOLUNKE LAY - OUT
RAJMATA CHOWK
RAUT WADI
WAWRE LAY - OUT
VIDHARBHA HOUSING SOCEITY
SHEREWALI CHOWK
AARAS LAY - OUT
BHADECH LAY - OUT
WANKHADE LAY - OUT
SANGAM CHOWK
SUVARNA NAGAR
KING PALES
BUS STAND
MUTHE LAY - OUT
MACHHEL LAY - OUT
INDIRA NAGAR
DHAD ROAD
BHILWADA
GANESH NAGAR
COLLEGE
JAYSTAMABH ROAD
CHIKHALI ROAD
RAJMATA CHOWK


3) 110MM DIA PVC 6KG/CM2 ------ 126 RMT
4) 100MM DIA PVC 6KG/CM2 ------ 48 RMT
5) 200MM DIA PVC 6KG/CM2 ------ 50 RMT
6) 200MM DIA PVC 6KG/CM2 ------ 36 RMT
7) 110MM DIA PVC 6KG/CM2 ------ 33 RMT
SCHOOL
DONGARE CHOWK
BHIM NAGAR
SUNIL KIRANA
Z.P. OFFICE
IQBAL CHOWK
TIPU SULTAN CHOWK
TIDJO NAGAR
SANGAM CHOWK
JAYSTAMAB CHOWK
NAGAR PARISHAD BULDANA
SHIVNERI NAGAR
SARAFA LINE
HDFC BANK
COURT
BULDANA URBAN
S.P.OFFICE
SAMBHAJI NAGAR
COLLECTOR OFFICE
POST OFFICE
KARANJA CHOWK
POLICE GROUND
TAHSIL CHOWK
CIVIL HOSPITAL
MILIND NAGAR
SHARADA VIDYAPITH SCHOOL
CHIKHALI ROAD
POLIC COLONY
FOR ZONE - II
MJP DIVISION
DRY.B
BULDANA CITY DISTRIBUTION
NETWORK
CHED
TRACED BY
S.D.E

S1

प्रति,
मा. विधानसभा सदस्य
बुलडाणा मतदार संघ
बुलडाणा

दि:- २०।३।२०१६

विषय:- नगर परिषद, बुलडाणा यांनी सुरु केलेल्या २०१५-१६ च्या कर आकारणी विषयी

अर्जदार:- सर्व रहिवासी अष्टविनायक नगर, महावीर नगर, केशव नगर, सरस्वती नगर, लक्ष्मी नगर महावीर नगर, राम नगर बुलडाणा

महोदय, आम्ही खालील सह्या करणार अर्जदार नम्रपणे कळवितो की
आम्ही बुलडाणा येथील कायम रहिवासी असून आमच्या कुटुंबासमवेत त्या त्या भागात राहतो. असे असतांना
बुलडाणा नगर परिषद यांनी स.न. २०१५ १६ चे आर्थिक वर्षात मालमत्ता कर, पाणीपट्टी

कर, या मध्ये दुपट्टीने वाढ करून एक वर्षाची (२९)
कर आकारणी ही १६ महिन्याची कर आकारणी
दर्शवून वाढीव बिले दिली आहेत तसेच ह्यामध्ये
घनकचरा उचलणी ही नविन कर आकारणी लागु
केली आहे. व सदर बाबतीत जोर, जबरदस्तीने
धमकावून वसुली सुरु केली आहे. जी बेकायदेशीर
आहे.

असे असतांना ह्या ठरावानुसार मालमत्ता कर
व पाणीपट्टी दुपट्टीने आकारली आहे. तो दि.
१६/२/२०१९ रोजीचा ठराव क्र. ७ हा रद्दबादल होऊन
मिळणेसाठी, सदर रहिवाशांनी जिल्हाधिकारी महोदय
यांचेकडे प्रकरण एम.एम.ए-३०८-६/१९ दि.
८/३/२०१९ दाखल केले आहे. ते सद्यस्थितीत सुरु
आहे.

असे असतांना नगर परिषदेचे कर्मचारी हे
विविध भागांमध्ये फिरून लोकांना धमकावून

पाणी पुरवठा बंद करून टाकून [illegible] 30
व वसुली करत आहेत जे न्याय व नितीचे
विरुद्ध आहे.

असे असताना सदर नागरिकांनी मा. जिल्हाधिकारी महोदय यांना व मुख्याधिकारी न.प. कुळगाव [illegible] दि. १६.३.१६ व दि. १८.३.१६ निवेदन देऊन प्रकरणाच्या न्याय निवाडा होईपर्यंत जबरदस्तीने वाढीव कर आकारणी मागू नये असे निवेदन दिले. तरी सुद्धा काही भागांमध्ये पाणीपुरवठा बंद करण्याच्या धमक्या देणे सुरु आहे.

आमची आपणांस कळकळीची विनंती आहे. की. सदर प्रकरणामध्ये समक्ष जातीने लक्ष घालून प्रकरणाचा निपटारा होईस्तोव वाढीव कर वसुली थांबविण्या बाबत संबंधीत अधिकाऱ्यांना सांगावे व जनतेस सहकार्य करावे.

आपल्या माहितीस्तव [illegible] सादर

[illegible] अर्ज

39

## अर्जदारांच्या सह्या

१) श्री. एस. व्ही. देशमुख, रामनगर

२) " उत्तमराव कृ. सोळुंके

३) " श्री. [illegible] कोर्डे

४) " आर. एस. नायडू

५) " यतीन्द्रनाथ गुप्ता.

६) रत्नाकर राजनकर

७) शशिकांत शिवाप्पा जोशी

८) [illegible]

१०) [illegible]

११) S. R. कुलकर्णी रामनगर

१२ [illegible]

१३ [illegible]

१४ सांगो सदाशिव वर्दे.

१५) निवृत्ती जगन्नाथ सोळे

१६) हरीभाऊ रामभाऊ खरे

१७) सुरेश लक्ष्मण भोसले

१८) सिद्धनाथ प्रल्हाद पाटील

१९ धनंजय विनायक देव

२० नितीन [illegible]

२१) तोताराम [illegible]

22) [illegible]

23) प्रसाद अनंत [illegible]

२४) मनोहर सदाशिव [illegible]

(32)

24 प्रल्हादराव मारोती शंटे

२९) पुरुषोत्तम ओंकार महाजन

20) तुकाराम विठू कोळी

21) सुरेश पी गवई

24 डॉ. संजय बी कुंभे

25) प्रा. बाबाराव सांगळे

30) सौ. मीरा वासुदेव खच

31) श्री. मोरे संतोष संभाजीराव

32) अक्षय रंगीलदास ढोले

33) प्रविण लक्ष्मीकांत महाजन

34) अविनाश उत्तमराव राठोड

35) राजाराम यादव चौधरी — R.Y.Chauhan

36) भरतसिंह भावसिंह राजपूत — B.B.Rajput

37) निवृत्ती उत्तम कोळे

38) पुंडलीक थोडीराम उगले — पी.टी. उगले

39) शिवराम काशीराम पवार — S.R.Pawar

परिशिष्ट दोन

# विभागाने सादर केलेली माहिती

# परिशिष्ट दोन

महाराष्ट्र शासन

क्र.एमयुएन-२०१६/प्रक्र. २९० /नवि-१८
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक -२९.१२.२०१६.

प्रति,

अवर सचिव, (ड-१५),
महाराष्ट्र विधान परिषद,
विधानमंडळ सचिवालय,
मुंबई.

विषय :- बुलढाणा शहराच्या सदोष पाणी वितरण व्यवस्थे बाबत.
श्री.रामहरी रुपनवार, वि.प.स.यांचा अर्ज.

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक ४०१४६/म.वि.स./विपविअस/ड-१५, दि.९.९.१६.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने श्री.रामहरी रुपनवार, वि.प.स यांनी बुलढाणा शहराच्या सदोष पाणी वितरण व्यवस्थे बाबत विनंती अर्ज समितीकडे केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे :-

१) बुलडाणा शहरातील सन २०११ मध्ये मंजूर करण्यात आलेली थ्रिझोन (त्रिव्हाल्व) वितरण व्यवस्था ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बुलडाणा यांनी पुर्ण करुन दिनांक २ ते९ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नगरपरिषदेकडे हस्तांतरीत केली आहे. बुलडाणा शहरातील थ्री झोन व्यवस्थेवर १२८.१४ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत.

२) थ्री झोन योजना कालावधीमध्ये वितरण व्यवस्था मधील त्रुटींचे पुर्णपणे निराकरण झालेले नाही. शहरातील काही भागामध्ये टाकलेली वितरण व्यवस्था फार जुनी असल्यामुळे तसेच पाणीपुरवठा वितरण व्यवस्थामधील भाग वाढल्यामुळे झोन क्र.१ व झोन क्र.३ मधील काही भाग वगळता दररोज पाणी पुरवठा करण्यात आला असून झोन क्र.२ मध्ये दररोज पाणी पुरवठा वितरण करणे शक्य झालेले नाही.

३) यासंदर्भात मा.राज्यमंत्री (नवि) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मा.राज्यमंत्री यांनी दिलेल्या निदेशानुसार झोन क्र.१ मध्ये एकदिवसाआड व झोन क्र.२ व ३ मध्ये तीन दिवसाआड पाणी वितरण करण्यात येत आहे. झोन क्र.१ मध्ये पुढील कालावधीत

यशस्वीरित्या पाणी वितरण **झाल्यानंतर झोन क्र.३ मध्ये सुध्दा** एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे प्रयत्न नगरपरिषदेमार्फत करण्यात येणार आहेत.

तसेच जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी बुलडाणा शहर पाणीपुरवठा योजनेमध्ये चौकशीसाठी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेब्रुवारी, २०१६ मध्ये सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नगरपरिषदेद्वारा अत्यावश्यक सुधारणाकामांतर्गत consumer servy, water audit, energy audit, hydraulic modeling, GIS mapping, rapairs of existing W.T.P. व उपांगाचे सविस्तर परिपुर्ण प्रस्तात तांत्रिक मंजूरीकरीता कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा., नागरी व ग्रामीण विभाग, बुलडाणा यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहेत व त्यास तांत्रिक मंजूरी प्रलंबित आहे.

४) झोन क्र.२ मध्ये पाणी पुरवठा यंत्रणा क्षमता वाढविणे आवश्यक असून १३ लक्ष लिटर्स क्षमतेची पाण्याची टाकी, संरक्षण भिंत व कर्मचारी निवासस्थान तसेच अनुषंगिक वितरण व्यवस्थाकरीता नागरी दलित वस्ती सुधार योजना, अंतर्गत प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे.

५) खडकपुर्णा प्रकल्पावरुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रु.८२.७७ कोटी रुपये किंमतीची योजना मंजूर झाली असून, न.न.हिश्श्याचा भरणा न केल्यामुळे सदर योजना प्रलंबित आहे. सदर योजनेच्या एकूण रु.१२.८१ कोटी न.प.हिश्श्यापैकी नगरपरिषदेने २० लक्ष रुपयाचा भरणा केलेला आहे.

तसेच १४ व्या वित्त आयोगातील सन २०१६-१७ च्या मुलभूत अनुदानाच्या हप्त्यातून या प्रकल्पाच्या न.प.हिश्श्यापोटी रु १.३० कोटी इतकी रक्कम वळती करण्यात आली आहे. उर्वरित लोकवर्गणीचा भरणा करण्याची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत करण्यात येत आहे.

६) वितरण व्यवस्थेमधील त्रुटी दूर करण्यासाठीच्या उपाययोजनांचा DPR तयार करुन तो तांत्रिक मान्यतेस्तव नगरपरिषेमार्फत सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त बाब कृपया विनंती अर्ज समितीच्या निदर्शनास आणण्यात यावी, अशी विनंती आहे.

आपला,

(अनिष परशुरामे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट दोन-अ

**श्री.रामहरी रुपनवार, वि.प.स. यांच्या "बुलढाणा शहराच्या सदोष पाणी वितरण व्यवस्थे बाबत" च्या विनंती अर्जावर सोमवार दिनांक २७.०२.२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता विधान भवन, मुंबई येथे प्र.स.(नवि २) यांच्या साक्षीबाबतची नगर विकास विभागाशी संबंधित मुद्यांबाबतची अद्ययावत माहिती.**

| अक्र | मुद्दा | अभिप्राय/सद्य:स्थिती |
|---|---|---|
| १ | बुलडाणा शहरातील सन २०११ मध्ये मंजूर करण्यात आलेली थ्रिझोन (थ्रिव्हाल्व) वितरण व्यवस्थेबाबत. | ➢ बुलडाणा शहराला पाणी वितरण व्यवस्थेत सुमारे १२५ व्हॉल्व नियंत्रित करून पाणीपुरवठा करण्यात येतो.<br>➢ वितरीत करावयाच्या एकुण क्षेत्राची तीन मुख्य भागामध्ये (झोन) विभागणी करून नियंत्रीत स्वरूपात तीन व्हॉल्वव्दारे या भागात पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्रधिकरणा मार्फत थ्री झोन व्यवस्था वितरणासाठी वापरण्यासाठी सुधारित करण्यात आली. याव्दारे एका झोनमध्ये एकाच व्हॉल्वच्या नियंत्रणातुन पाणीपुरवठा करणे अपेक्षित होते.<br>➢ बुलडाणा शहर वितरण व्यवस्थेबाबत जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे निर्देशानुसार त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती.<br>➢ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिनांक २ ते ९ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत याची चाचणी करून नगरपरिषदेकडे ती हस्तांतरीत केल्याचे नमुद केले आहे.<br>➢ तथापि, सदर थ्री झोन व्यवस्था संपूर्णपणे यशस्वीरित्या कार्यान्वित झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.<br>➢ याबावत करण्यात येणाऱ्या सुधारणांची माहिती अनुक्रमांक ५ मध्ये देण्यात आली आहे. |
| २ | बुलडाणा शहरात एकदिवसाआड / तीन दिवसाआड होणारा पाणीपुरवठा. | ➢ शहरासाठीच्या जलस्त्रोताच्या उपलब्धतेची स्थिती विचारात घेऊन बुलढाणा नगरपरिषदेने ठराव क्र.३७, दि.१०/०९/२०१५ रोजी शहरामध्ये तीन दिवसा आड पाणी पुरवठा करण्याचा ठराव केला होता.<br>➢ सद्यस्थितीत झोन क्र.२ व ३ मध्ये ३ दिवसा आड तर झोन क्र.१ मध्ये एक |

| | | |
|---|---|---|
| | | दिसाआड पाणी पुरवठा होत असल्याचे मुख्याधिकारी यांनी नमुद केले आहे.<br>➢ झोन क्र.२ मध्ये पाणी पुरवठा यंत्रणा क्षमता वाढविण्यासाठी १३ लक्ष लिटर्स पाणी क्षमतेची टाकी उभारणे यासाठीच्या प्रस्तावास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी प्राप्त झाली असुन जिल्हाधिकारी यांचेकडुन प्रशासकीय मंजुरी प्राप्त करण्यात येत आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा वारंवारतेत सुधारणा अपेक्षित आहे.<br>➢ झोन क्र.३ मध्ये वितरण व्यवस्थेतील मुलभूत सुधारणानंतर पाणी पुरवठाा वारंवारतेत सुधारणा अपेक्षित आहे. प्रस्तावित सुधारणांची माहिती अ.क्र.५ मध्ये नमूद आहे. |
| ३ | खडकपुर्णा प्रकल्पाबाबत. | ➢ खडकपुर्णा प्रकल्पावरुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रु.८२.७७ कोटीचां प्रस्ताव मंजुर असून यात शासनाचा हिस्सा वितरीत करण्यात आला असून नगरपरिषदेच्या रु.१२.८१ कोटी हिस्स्या पैकी सद्य:स्थिती रु.६.९७ कोटीचा भरणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे करण्यात आला आहे. |
| ४ | नगरपरिषदेने पाणी पट्टी करात दुप्पटीने केलेली वाढ. | ➢ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम १०८ तसेच कलम १३२ अंतर्गत पाणी पट्टी कर आकारण्याचा नगरपरिषदेस अधिकार प्राप्त आहे.<br>➢ मुख्याधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे स्थायी आदेशानुसार घरगुती ½ इंच नळ जोडणीसाठी १९९८ पासून दरवर्षी १० टक्के दरवाढीनुसार सन २०१५ मध्ये रु.४०७६.९६ एवढ्या शुल्का ऐवजी रु.१७७२ एवढेच शुल्क आकारण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| ५ | अ) जिल्हाधिकारी बुलडाणा यांनी बुलडाणा शहर पाणीपुरवठा योजनेमध्ये चौकशीसाठी नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने फेब्रुवारी, २०१६ मध्ये सादर केलेल्या चौकशी अहवालाबाबत.<br>ब) वितरण व्यवस्थेमधील त्रुटी दूर करण्यासाठी DPR तयार करणे. | ➢ चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नगरपरिषदेद्वारा अत्यावश्यक सुधारणाकामांतर्गत consumer servy, water audit, energy audit, hydraulic modeling, GIS mapping, rapairs of existing W.T.P. व उपांगाचे सविस्तर परिपुर्ण प्रस्ताव तांत्रिक मंजूरीकरीता कार्यकारी अभियंता, म.जि.प्रा., नागरी व ग्रामीण विभाग, बुलडाणा यांच्याकडे सादर करण्यात आलेले होते.<br>➢ प्रस्तावातील त्रुटींचे निराकरण करण्यासाठी Repairs of W.T.P.(water treatment plant) व SCADA (supervisory control & data acquisition control) हे उपांग वगळून सुधारणा कामाचे रुपये ९५,०३,१४५/- किंमतीचे प्रस्ताव तांत्रिक मंजूरी साठी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे नगरपरिषदेमार्फत दिनांक १८.०२.२०१७ रोजी सादर करण्यात आले आहेत.<br>➢ वितरण व्यवस्थेमधील त्रुटी दूर करण्यासाठीच्या उपाययोजनांचा DPR तयार करुन तो तांत्रिक मान्यतेस्तव नगरपरिषदेमार्फत सादर करण्यात आला आहे.<br>➢ अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमधील त्रुटींचे निरीक्षणासाठी सुधारणा कामाचे प्रस्ताव तांत्रिक मंजूरी साठी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे नगरपरिषदेमार्फत दिनांक १८.०२.२०१७ रोजी सादर करण्यात आले आहे.<br>➢ तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत बुलडाणा व ४ गांवे पाणीपुरवठा योजनेच्या दुसऱ्या टप्पयातील कामामध्ये वितरण व्यवस्थेचा समावेश असून सदर कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बुलडाणा यांच्याद्वारे राबविण्यात येणार आहे. त्यान्वये अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमधील त्रुटिंचे निराकरण होईल. |

# परिशिष्ट तीन
# समितीच्या बैठका

**पहिली बैठक**

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी दुपारी १-००वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थितीः**

श्री. माणिकराव ठाकरे, मा. उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

**विशेष निमंत्रित**

श्री. कपिल पाटील, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी :—**

(१) श्री. अनिष परशुरामे, उप सचिव, नगरविकास विभाग

(२) श्री. करण कुमार चव्हाण, मुख्याधिकारी, बुलडाणा

(३) श्री. अजय व्यवहारे, पाणीपुरवठा अभियंता, नगर परिषद, बुलडाणा

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, नगरविकास विभागाच्या व अन्य अधिका-यांच्या साक्षी नोंदविल्या.

**दुसरी बैठक**

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी दुपारी ४-०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. शरद रणपिसे, वि.प.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख.

(२) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१) ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(३) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (एम)

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती),

(४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई